RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
२२ गुरुवार जानेवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २३७
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

### साताऱ्यात भाजपाचा 'एल्गार':



■ सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस बुधवारी होता. सकाळपासून इच्छूकांनी शक्तीप्रदर्शन करत आपला अर्ज दाखल केल्याने अर्ज स्वीकृती केंद्रावर गर्दी झाली होती. सातारा जिह्यात भाजपाने तब्बल 60 ठिकाणी जिल्हा परिषदेसाठी अर्ज भरले असून पंचायत समितीसाठी 118 ठिकाणी अर्ज भरले आहेत. एकनाथ शिंदे गटाचे नेते एबी फॉर्म वाटून चक्क आजारी पडल्याने माहिती समजू शकली नाही. राष्ट्रवादी शरद पवार गटाने 18 जिल्हा परिषद गट आणि 26 गणात उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी अजितदादा गटानेही अर्ज मोठया संख्येने भरलेले आहेत. त्यांची आकडेवारी समजू शकली नाही.

## सोने १ लाख ६० हजारांवर; चांदीत तेजी कायम

**विदर्भ केसरी। जळगाव**

गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे सोनं अन् चांदीच्या किमतीत उच्चांकी वाढ नोंदवण्यात आली आहे. जळगावच्या सराफ बाजारामध्ये सोन्याच्या आणि चांदीच्या दरामध्ये सलग तिस-या दिवशी प्रचंड मोठी वाढ झाली. सोन्याच्या दरामध्ये तब्बल ७ हजार ५०० रुपयांची तर चांदीच्या दरामध्ये तब्बल दहा हजार रुपयांची वाढ नोंदवण्यात आली. सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख ५९ हजार ६५० रुपयांच्या तर चांदीचे दर ३ लाख ३२ हजार ६५० रुपयांच्या ऐतिहासिक उच्चांकीवर पोहोचले आहेत. सलग तीन दिवसांपासून सोन्या आणि चांदीच्या दरामध्ये तेजी असून दराने आजपर्यंतचे विक्रम मोडले आहेत.

## ईव्हीएममध्ये १०० टक्के घोटाळा

**विदर्भ केसरी। धाराशिव: प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा, नगरपालिका, महापालिका निवडणुकीत विरोधकांची पीछेहाट सुरू आहे. यातून पुन्हा एकदा ईव्हीएम मशिनबाबत संशय व्यक्त होऊ लागला आहे. 'निवडणूक आयोग हा त्यांचा (सत्ताधा-यांचा) गुलाम झाला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत ईव्हीएम यंत्राचा वापर झाला पण व्हीव्हीपॅट मशिन लावली नाही. म्हणजे कोणाला मत दिले हे कळाले नाही त्यामुळे ईव्हीएम मशिनमध्ये १०० टक्के घोटाळा आहे असा आरोप कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोगासह सत्ताधा-यांवर केला आहे. धाराशिव इथल्या धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानने ईव्हीएम हटवण्यासाठी बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी या आंदोलनकर्त्यांची भेट घेत, पाठिंबा दिला आहे. याशिवाय विधानसभानंतर निवडणुकीत विरोधकांचा एकतर्फा होत असलेल्या पराभवावर चिंता व्यक्त करताना, ईव्हीएममध्ये १०० टक्के घोटाळा असल्याचा संशय व्यक्त केला आहे. पुढे बोलताना थोरात म्हणाले. निवडणूक मतमोजणीला, प्रक्रियेला उशीर होतो. उशीर होत असेल तर सरळ मतपत्रिकेवर निवडणुका घ्या. ईव्हीएम कुठून आणणार तर मध्य प्रदेशातून. ज्या मध्य प्रदेशात सर्वात मोठा ईव्हीएममध्ये घोटाळा झाला.

# पुन्हा तारीख पे तारीख

## ओबीसी आरक्षण : दुस-या टप्प्यातील जि. प. निवडणूक कार्यक्रम लांबणीवर ?

**विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक घेण्यासाठी न्यायालयाने अनुमती दिली असली तरी सर्व निवडणुका अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असे न्यायालयाने यापूर्वी स्पष्ट केले आहे. आज या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार होती मात्र हे प्रकरण पोहोचू न शकल्यामुळे ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली. यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या दुस-या टप्प्यातील निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत.





यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या, त्यानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पूर्ण होणे अपेक्षित होते मात्र ज्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आरक्षण मर्यादेचा प्रश्न नाही त्या निवडणुका पूर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून द्यावा, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्याला मान्य करत न्यायालयाने १५ फेब्रुवारी पर्यंत मुदत दिली आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाने ही मुदत ज्या जिल्हा परिषदेमध्ये आणि पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आरक्षणाचा प्रश्न नव्हता त्याबाबत मागितली होती.

त्यामुळे उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणा-या पंचायत समित्या यांच्याबाबत निर्णय काय लागेल, हे बुधवारच्या सुनावणीतून माहिती होऊ शकले असते मात्र सुनावणी झाली नाही. त्यामुळे याबाबतचा निर्णय पुन्हा एकदा लांबणीवर पडला. परिणामी उरलेल्या २० जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत येत असलेल्या पंचायत समित्यांचा निवडणुकीचा कार्यक्रमही लांबणीवर पडला आहे.

### काय होता अर्जदारांचा दावा?

■ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये निकाल दिला होता. राज्य सरकारने ओबीसी प्रवर्गाला दिलेल्या २७ टक्के आरक्षणामुळे राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. काही ठिकाणी आरक्षण ७० टक्क्यांवर पोहोचले आहे. हा न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. यावर आज सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

# सुनावणी लांबणीवर



**विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरील सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सुनावणी होणार होती. मात्र, ती पुढे ढकलण्यात आली. न्यायालयात फक्त दोन न्यायाधीशांचे खंडपीठ उपलब्ध असल्यामुळे ही सुनावणी होऊ शकली नाही. सीमाप्रश्नासारख्या घटनात्मक आणि आंतरराज्यीय प्रकरणाची सुनावणी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर होणे आवश्यक असल्याने प्रकरण पुढे ढकलण्यात आले. विशेष म्हणजे, तब्बल आठ वर्षांनंतर महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या मूळ दाव्यावर सविस्तर सुनावणी होणार होती.

या सुनावणीकडे सीमावासीयांचे लक्ष लागून रहिले होते. वरिष्ठ विधितज्ज्ञ ॲड. सी. एस. वैद्यनाथन आणि ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली होती. महाराष्ट्र सरकारने २००४ साली सर्वोच्च न्यायालयात हा दावा दाखल केला होता. त्यानंतर अनेक वर्षे विविध कारणांमुळे प्रत्यक्ष मुद्यावर सुनावणी होत नव्हती. अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे.

# गुजरातची आंतरराज्य 'डुक्कर चोर' टोळी जेरबंद:

**विदर्भ केसरी।**

गेल्या अनेक दिवसांपासून भोकरदन शहर आणि परिसरात डुकरांची चोरी करून हैदोस घालणाऱ्या गुजरातच्या आंतरराज्य टोळीचा भोकरदन पोलिसांनी अत्यंत धाडसी पद्धतीने पर्दाफाश केला आहे. एखाद्या ॲक्शन चित्रपटाला शोभावा असा 'सिनेस्टाईल' पाठलाग करून पोलिसांनी या टोळीतील ७ सदस्यांना बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईदरम्यान झालेल्या झटापटीत एक पोलिस अंमलदार जखमी झाला असून, पोलिसांनी चोरट्यांकडून एक पिकअप वाहन आणि चोरीचे साहित्य जप्त केले आहे.



भोकरदन शहरात वराह पालन करणाऱ्या नागरिकांची डुकरे चोरीला जाण्याचे प्रमाण गेल्या काही दिवसांत लक्षणीय वाढले होते. या चोऱ्यांमुळे वराह पालकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याने परिसरात संतापाचे वातावरण होते. याप्रकरणी १४ जानेवारी रोजी डुकरांच्या मालकांनी भोकरदन पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत चोरट्यांचा शोध घेण्यासाठी एक विशेष तपास पथक नियुक्त केले होते.

दिनांक २१ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास पोलिस निरीक्षक किरण बिडवे स्वतः पथकासह गस्त घालत असताना त्यांना एका गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, शहरात एक संशयित पिकअप वाहन (गुजरात पासिंग) फिरत आहे. पोलिसांनी या वाहनाचा शोध सुरू केला असता, चालकाने पोलिसांची गाडी पाहून पिकअप जाफराबाद रोडच्या दिशेने भरधाव वेगात पळवली. पोलिसांनी तात्काळ या वाहनाचा पाठलाग सुरू केला.

■ पोलिसांनी पाठलाग सुरूच ठेवल्याने चोरटे घाबरले. त्यांनी माहोरा गावाजवळून अचानक 'यु-टर्न' घेतला आणि पुन्हा भोकरदनच्या दिशेने गाडी वळवली. दरम्यान, पोलिस निरीक्षक बिडवे यांनी समयसूचकता दाखवत विरेगाव येथील दुसऱ्या पथकाला आणि पोलिस मित्रांना रस्ता अडवण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांनी विरेगाव फाट्यावर चक्क ट्रॅक्टर आडवे लावून रस्ता रोखून धरला. रस्ता बंद असल्याचे पाहून चोरट्याने पिकअप वाहन थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात घातले.

# आज महापौरपदासाठी सोडत

**विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी आज गुरूवारी मंत्रालयात सोडत काढली जाणार आहे. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. या सोडतीनंतर महापौर पदाची लॉटरी कुणाला लागणार, हे स्पष्ट होईल. महापौर पदाच्या आरक्षणात स्पष्टता आल्यानंतर महापालिकेतील सत्ता स्थापनेच्या घडामोडींना वेग येणार आहे. आजच्या आरक्षण सोडतीत सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणा-या मुंबई महापौरपदाच्या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होऊन दुस-या दिवशी निकाल जाहीर झाले. १६ जानेवारीला निकाल घोषित झाल्यापासून मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरच्या महापौर पदासाठी भाजप आणि शिवसेना शिंदे गटात रस्सीखेच सुरू आहे. या शिवाय भिवंडी, चंद्रपूर येथेही महापौरपद पटकावण्यावरून कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गट यांच्यात चढाओढ लागली आहे. या पार्श्वभूमीवर आज महापालिकांच्या महापौर पदाची सोडत निघत आहे.

नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौर पदाची आरक्षण सोडत निघेल. या सोडतीत कोणत्या महापालिकेतील महापौर पद आरक्षित झाले आणि कोणत्या महापालिकेत खुल्या प्रवर्गातील महापौर बसणार हे स्पष्ट होईल. नगर विकास विभागात सध्या महापौर आरक्षण सोडतीची जोरात तयारी सुरू आहे. नव्याने गठीत करण्यात आलेल्या जालना आणि इचलकरंजी महापालिका वगळता अन्य महापालिकांमध्ये कार्यकाळ संपण्याआधी शेवटचे महापौर पदाचे आरक्षण कधी लागू झाले आणि त्याची मुदत कधी संपली, याची माहिती गोळा करण्यात आली आहे.

■ **या महापालिकांसाठी आज आरक्षण सोडत**

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार, भिवंडी -निजामपूर, पनवेल, नाशिक, अहिल्यानगर, मालेगाव, धुळे, जळगाव, नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, जालना, लातूर, नांदेड.

# कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा राडा!

## खासदार कल्याण काळेंच्या कार्यालयावर चढवला हल्ला; निष्ठावंतांना डावलल्याचा आरोप

**विदर्भ केसरी।**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या उमेदवारी वाटपावरून फुलंब्रीमध्ये कॉंग्रेस पक्षांतर्गत धुसफूस उफाळून आली असून, संतापलेल्या कार्यकर्त्यांनी थेट खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाला लक्ष्य केले. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्याचा गंभीर आरोप करत आक्रमक कार्यकर्त्यांनी कार्यालयात शिरून फर्निचरची मोठी तोडफोड केली आणि जोरदार घोषणाबाजी करत राडा केला. निवडणुकीच्या रणधुमाळीत भरदिवसा घडलेल्या या हिंसक प्रकारामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, कॉंग्रेसमधील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आले आहेत.



तिकीट वाटपातील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना मिळणारी दुय्यम वागणूक, हेच कार्यकर्त्यांच्या या तीव्र संतापाचे मुख्य कारण असल्याचे समोर येत आहे. पाल जिल्हा परिषद गटातून माजी युवक कॉंग्रेस अध्यक्ष वरुण पाथ्रीकर यांच्यासारख्या एकनिष्ठ कार्यकर्त्याला डावलून शेवटच्या क्षणी ज्ञानेश्वर जाधव यांना संधी देण्यात आल्याने, तसेच बाबरा गटात अजिनाथ सोनवणे यांना आश्वासन देऊनही ऐनवेळी डावलल्याने कार्यकर्त्यांच्या संयमाचा बांध सुटला. "पैसे घेऊन उमेदवारी विकली जात असून हे कॉंग्रेस पक्ष संपवण्याचे कारस्थान आहे," असा थेट आणि गंभीर आरोप करत कार्यकर्त्यांनी पक्षनेतृत्वाच्या भूमिकेबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे.

# भारताने न्यूझीलंडचा 48 धावांनी केला पराभव

## अभिषेकच्या 84 धावा, चक्रवर्ती-दुबेला 2-2 विकेट; फिलिप्सची फिफ्टी बेकार



**विदर्भ केसरी।**

भारताने पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा ४८ धावांनी पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. बुधवारी नागपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना भारताने २३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, किवी संघाला फक्त १९० धावा करता आल्या. अभिषेक शर्माने ८४ धावा केल्या, तर वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

व्हीसीए स्टेडियमवर भारताकडून रिंकू सिंगने ४४, कर्णधार सूर्यकुमार यादवने ३२ आणि हार्दिक पंड्या यांनी २५ धावा केल्या. अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. न्यूझीलंडकडून जेकब डफी आणि काइल जेमीसन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. मार्क चॅपमनने फलंदाजी करताना संघाकडून ३९ धावा केल्या. दुसरा टी-२० सामना २३ जानेवारी रोजी रायपूरमध्ये खेळला जाईल.

### पहिल्या टी२० मधील काही ठळक मुद्दे

- अभिषेकने ५,००० टी२० धावा पूर्ण केल्या.
- सूर्याला सलग २३ व्या डावात अर्धशतक झळकावता आले नाही.
- भारताने न्यूझीलंडविरुद्ध पहिल्यांदाच १४ षटकार मारले.
- भारत-न्यूझीलंड टी-२० सामन्यातील सर्वोच्च धावसंख्या ४२८ आहे.

### अक्षरच्या बोटाला चेंडू लागला

■ १६ व्या षटकात अक्षर पटेलच्या बोटाला दुखापत झाली. हाच बोट तो चेंडू फिरवण्यासाठी वापरतो. तो विश्वचषक संघाचा उपकर्णधार आहे.

# अन् विद्यार्थ्यांसमोर रंगला तोफांचा अग्निवर्षाव!

**विदर्भ केसरी। नाशिक -**

विविध क्षमतेच्या तोफांचा भडिमार, रॉकेट लॉंचरचा मारा, अग्नि वर्षावाने उजळलेली फायरिंग रेंज, हवेतून मार्गक्रमण करणारे असंख्य ड्रोन, गनर्स आणि पॅरा ग्लॉयडर्सचे कौशल्य... युद्धभूमीवरील तोफखाना दलाच्या प्रहारक क्षमतेचे दर्शन तोफखाना स्कूलतर्फे आयोजित तोपची सोहळ्यात घडले. विशेष म्हणजे स्कूलने यंदा सातवेळा ही प्रात्यक्षिके सादर केली. त्याचे १५ हजार जण साक्षीदार ठरले. त्यामध्ये सातारा सैनिक शाळेसह पुणे, नाशिकच्या शालेय विद्यार्थ्यांपासून ते थेट नेपाळ लष्करातील प्रशिक्षणार्थ्यांपर्यंतचा समावेश आहे. .




देवळाली कॅम्पस्थित तोफखाना स्कूलतर्फे बुधवारी आयोजित तोपची सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून वेलिंग्टनच्या संरक्षण सेवा महाविद्यालयाचे कमांडंट लेफ्टनंट जनरल मनिश एरी उपस्थित होते. तोफखाना स्कूलचे कमांडंट तथा तोफखाना रेजिमेंटचे कर्नल कमांडेट लेफ्टनंट जनरल नवनीत सिंह सरना यांच्या नेतृत्वाखाली या वर्षी सात वेळा तोपचीचे आयोजन करण्यात आले.

तोफखान्याच्या प्रहारक क्षमतेची १५ हजार नागरिकांना अनुभूती मिळाली. वेलिंग्टनच्या संरक्षण सेवा महाविद्यालय, नेपाळ लष्करी सेवा महाविद्यालयाचे प्रशिक्षणार्थी व भारतीय लष्करातील अधिकारी उपस्थित होते. सोहळ्यात विविध आधुनिक तोफांसह पिनाका, स्मर्च रॉकेट लॉंचर, स्वार्म ड्रोन, लॉयटींग म्यूनिशन आणि प्रगत ड्रोन सहभागी झाले होते.

जवळपास तासभर चाललेल्या कार्यक्रमात तोफा आणि रॉकेटच्या भडिमारामुळे फायरिंग रेंजला युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झाले. यात १२० एम.एम. मोर्टर, स्वदेशी के – ९ वज्र, धनुष, बोफोर्स, हलक्या वजनाच्या एम ७७७, सोल्टम, इंडियन फिल्ड गन, लाईट फिल्ट गन या तोफा सहभागी झाल्या होत्या.

एकाचवेळी ४० रॉकेट डागण्याची क्षमता असणारे १२२ एम.एम. मल्टीबॅरल रॉकेट लॉंचर, पिनाका आणि हेलिकॉप्टरच्या कामगिरीचे दर्शन घडविण्यात आले. संदेश मिळताच तोफखाना अल्पावधीत सज्ज होतो. एकाचवेळी तोफांनी असा भडीमार केला की, फायरिंग रेंजचा परिसर धुराने वेढला गेला. तोफखान्याच्या माऱ्याचे मानवरहित विमानांनी निरीक्षण केले. तोफखान्याचा माऱ्यात महत्वाची भूमिका निभावणारी टेहळणी-लक्ष्य निश्चिती विभागाच्या (साटा) उपकरणांची कार्यपद्धती मांडली गेली. पॅरा ग्लायडर्सचे कसब दाखवले गेले.

### सीमा सुरक्षा दलही मैदानात

■ यंदाच्या सोहळ्याचे वैशिष्ठ्य म्हणजे. सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) जवानही लाईट फिल्ड गन अर्थात हलकी तोफ घेऊन पहिल्यांदा सहभागी झाले होते. भारतीय नौदलाच्या आयएनएस द्रोणाचार्य संस्थेतील काही अधिकाऱ्यांनी तोफखाना स्कूलमध्ये ड्रोनचे प्रशिक्षण घेतल्याची माहिती तोफखाना स्कूलचे कमांडंट तथा तोफखाना रेजिमेंटचे कर्नल कमांडंट लेफ्टनंट जनरल नवनीत सिंह सरना यांनी दिली. मागील काही युद्धात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. प्रात्यक्षिकांमध्ये विविध कामगिरी करणारे ड्रोन सहभागी झाले होते. त्यांचे प्रशिक्षण स्कूलकडून दिले जाते. तरुणाईने लष्करी सेवेकडे आकर्षित व्हावे, यासाठी शालेय विद्यार्थ्यांना सोहळ्यात सहभागी करण्यात आल्याचे सरना यांनी सांगितले.

# भीषण अपघातात २ ठार

**विदर्भ केसरी। चंद्रपूर:**

तेलंगणा राज्यात रोवणीच्या कामासाठी गेलेल्या मजूर महिलांना घेऊन परत येणाऱ्या पिकअप बोलेरो वाहनाचा बुधवारी पहाटे ५.३० वाजताच्या सुमारास नांदगाव येथे भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर २२ मजूर जखमी झाले आहेत. घटनास्थळी प्राप्त माहितीनुसार, पोंभुर्णा तालुक्यातील डोंगरहळदी येथील वनिता भिकाजी मरस्कोले (३८ ) यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच नांदगाव येथील हरिदास विलास मीटपल्लीवार (४३) हे गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात नेताना उपचारापूर्वीच मृत्यूमुखी पडले.

सिंदेवाही तालुक्यातील पवनपार आणि चिंधी चेक, तसेच पोंभुर्णा तालुक्यातील डोंगरहळदी येथील महिला मजूर तेलंगणा राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील सोमपल्ली येथे रोवणीसाठी गेले होते. काम संपल्यानंतर सर्व मजूर पिकअप बोलेरो (क्रमांक एमएच ३४ बीझेड ३१२७) वाहनाने परत येत असताना नांदगाव जवळील वळण मार्गावरील मोठ्या खड्ड्यामुळे वाहन चालकाचा ताबा सुटला. वेगाने चाललेल्या वाहनाने रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या हरिदास मीटपल्लीवार यांना जोरदार धडक दिली. त्यानंतर वाहन थेट विजेच्या खांबावर आदळल्याने गावातील वीजपुरवठा खंडित झाला. गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात हलविण्यात आलेल्या हरिदास यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. अपघातात जखमी झालेल्या २२ मजुरांना तातडीने मूल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले गेले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच प्रशासनासह मूल व पोंभुर्णा येथील आरोग्य यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप केला आहे.

## अग्रलेख

# चांदीची चांदी!

*जागतिक बाजारपेठेतील वाढती अनिश्चितता आणि भू-राजकीय तणावाचा थेट परिणाम भारतीय सराफा बाजारावर दिसून येत आहे. सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्या-चांदीकडे कल वाढल्याने मंगळवारी दोन्ही मौल्यवान धातूंनी ऐतिहासिक उच्चांक प्रस्थापित केला. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर (एमसीएक्स) सोन्याच्या दराने प्रथमच दीड लाखाचा टप्पा ओलांडला असून चांदीने ३.२७ लाख प्रति किलोचा टप्पा गाठून सर्वांनाच चकित केले आहे. सोन्याचा भाव ६८६१ रुपयांच्या वाढीसह १,५२,५०० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे दर प्रति औंस ४७०० डॉलरच्या पार गेल्याने आणि रुपयाची सातत्याने होणारी घसरण यामुळे २०२६च्या सुरुवातीपासूनच सोन्यातही तेजी पहायला मिळत आहे. चांदीच्या दरातही अभूतपूर्व वाढ झाली. चांदीचा भाव १७,७२३ रुपयांनी वधारून ३,२७,९९८ रुपये प्रति किलो या 'ऑल टाईम हाय' वर पोहोचला. गत दोन सत्रांत चांदीच्या दरात ३२ हजार रुपयांहून अधिक वाढ झाली आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियनमधील संभाव्य 'व्यापार युद्ध', आर्थिक अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांनी शेअर बाजाराऐवजी सोन्याला दिलेली पसंती, आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्याचा परिणाम या दरवाढीवर झाल्याचे सांगण्यात येत आहे. बाजार तज्ज्ञांच्या मते जोपर्यंत आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थिरता येत नाही, तोपर्यंत ही अस्थिरता कायम राहील. या दरवाढीमुळे ज्यांनी कमी दरात सोने खरेदी केले आहे, त्यांना नफा कमावण्याची चांगली संधी आहे. लग्नसराईसाठी खरेदी करणा-यांना वाढीव किमतीचा फटका बसणार आहे. त्यामुळे सध्याच्या दरात गुंतवणूक करण्याऐवजी थोडी प्रतीक्षा करणे योग्य ठरू शकते. बाजार सध्या अत्यंत अस्थिर असल्याने घाईघाईत कोणताही निर्णय न घेता बाजाराच्या स्थिरतेची वाट पाहणे हिताचे ठरेल. सराफा व्यापा-यांच्या मते सध्या बाजारात तेजीचे वातावरण असल्याने सर्वसामान्यांनी आणि गुंतवणूकदारांनी अत्यंत सावधगिरीने पावले उचलण्याची गरज आहे. जागतिक बाजारातील अस्थिरतेमुळे गुंतवणूकदारांनी सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून मौल्यवान धातूंकडे धाव घेतल्याने दोन्ही धातूंनी विक्रमी पातळी गाठली. चांदीच्या दरात एकाच दिवसात १७ हजार रुपये प्रति किलोची वाढ नोंदवण्यात आली. दोन दिवसांत चांदी ११ टक्क्यांनी महागली, ही तेजी थक्क करणारी आहे. सोमवारी चांदीने पहिल्यांदाच ३ लाख रुपये प्रति किलोचा टप्पा पार केला होता. केवळ दोन ट्रेडिंग सत्रामध्ये चांदीची किंमत ३२,१८७ रुपयांनी वाढली. म्हणजे केवळ दोन दिवसांत चांदी ११.१८ टक्क्यांनी महागली. 'तूफान आलंय दर्याला'च्या चालीवर चांदीच्या दरातही तूफान आलं आहे. भू-राजकीय तणावाचा परिणाम चांदीच्या किमतीत अचानक वाढ होण्यावर झाला आहे. सोमवारी ट्रम्प यांनी ग्रीनलँड जोडण्यासाठी लष्करी बळाचा वापर करण्याचे संकेत दिल्यानंतर सुरक्षित गुंतवणूक म्हणून चांदी आणि सोन्याची मागणी शिगेला पोहोचली. आंतरराष्ट्रीय बाबींमधील डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'विघटनकारी' धोरणांमुळे मौल्यवान धातूंच्या किमती सतत वाढत आहेत. जागतिक तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेमुळे चांदीची चमक वाढतच असून चांदीच्या किमती विक्रमी उच्चांक गाठत असताना येत्या काळात चांदीच्या किमतीत लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे. चांदीची किंमत ३० टक्के किंवा त्याहून अधिक कमी होण्याची शक्यता आहे. चांदीची किंमत १ लाखापर्यंत घसरू शकते. ३ लाखापेक्षा जास्त किमतीच्या चांदीत गुंतवणूक केल्यास तुम्हाला जास्त फायदा मिळू शकत नाही असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत येत्या काळात चांदीची मागणी लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. उत्पादक आता सौर पॅनेल, इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये चांदीचा पर्याय शोधत असून उत्पादकांकडे स्वस्त पर्याय असताना ते इतकी महागडी चांदी का वापरतील? महागडी चांदी वापरल्याने उत्पादनाच्या किमतीदेखील वाढू शकतात म्हणून उत्पादक इतका मोठा धोका पत्करणार नाहीत. सोन्या-चांदीच्या आकाशाला भिडलेल्या किमती आणि दिवसागणिक या किमतीत होत असलेली वाढ पाहता बाबा वेंगाची भविष्यवाणी खरी ठरताना दिसते आहे*

*बल्गेरियाची भविष्यवेत्ती बाबा वेंगाने सोने दराविषयी मोठे भाकित केले होते. आर्थिक संकट हे पारंपरिक बँकिंग प्रणाली प्रभावित करू शकते. त्यामुळे अनेक लोक सोन्या-चांदीत अधिकाधिक गुंतवणूक करतील असे त्या म्हणाल्या होत्या. सोन्याच्या किमती २५ ते ४० टक्क्यांपर्यंत वाढू शकतात असे भाकित होते. सध्या सोन्याचा भाव १० ग्रॅमला १ लाख ४७ हजार रुपयांवर पोहोचला आहे. सोने-चांदीचे दर उच्चांक प्रस्थापित करीत असताना सध्या एक धातू शांत आहे. तो म्हणजे तांबे. काही वर्षांपूर्वी तांब्याचा वापर मुख्यत: बांधकाम आणि कारखान्यापुरताच मर्यादित होता. रिअल इस्टेट किंवा उत्पादन क्षेत्र मंदावले की तांब्याची मागणीही घटायची. पण आता परिस्थिती बदलली आहे. आता तांबे हे डिजिटल जग आणि ग्रीन एनर्जी या दोन मोठ्या बदलांचा महत्त्वाचा घटक बनला आहे. सध्या तांब्याची मागणीही वाढतेय. कारण इलेक्ट्रिक गाड्या वाढत आहेत, सोलर-विंड एनर्जी प्रकल्प वाढत आहेत आणि डेटा सेंटर्स उभे राहत आहेत. या सा-यांसाठी तांबे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात तांब्याची मागणी वाढणार असून ते 'नव्या युगाचं सोनं' ठरू शकेल. इलेक्ट्रिक कारमध्ये पेट्रोल कारच्या तुलनेत सुमारे तीनपट जास्त तांबे लागते. रिन्यूएबल एनर्जी प्रकल्प, चार्जिंग स्टेशन आणि स्मार्ट ग्रिडस् यांना तांब्याची गरज आहे. त्यामुळे भविष्यात तांब्यातही गुंतवणूक वाढू शकते. तांबे दीर्घकाळासाठी मजबूत वाटत असले तरी तांब्यातील गुंतवणूक जोखमीची ठरू शकते. कारण आर्थिक मंदी आल्यास त्याची मागणी अचानक घटू शकते. तांब्यातील गुंतवणूक सोन्यासारखी 'सुरक्षित' नाही. सध्या सोन्याने दीड लाखाचा टप्पा ओलांडला आहे.*

# योजना कागदावर न राहता थेट रुग्णांपर्यंत पोहोचली पाहिजे – डॉ. ओमप्रकाश शेटे

## पॅकेज दरवाढ, पारदर्शकता व रुग्णांना अधिक लाभ देण्यासाठी शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



राज्यातील सार्वजनिक व खासगी रुग्णालयांतील उपचार पॅकेजचे दर अनेक वर्षांपासून न बदलल्याने रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाची आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महाराष्ट्र शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांची एकत्रित व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे व दूरगामी निर्णय घेतले आहेत.

हॉस्पिटल प्रशासनाच्या मते, ही योजना २०१२ मध्ये लागू झाली असली तरी उपचार पॅकेजेस २००७ मधील आंध्रप्रदेशच्या दरांवर आधारित होती आणि त्यामध्ये आजवर कोणतीही सुधारणा झाली नव्हती. याची दखल घेत प्रत्येक जिल्ह्यात जाऊन तक्रारींचा सखोल अभ्यास, प्रत्यक्ष पॅकेज दरांची तपासणी करून सविस्तर अहवाल शासनास सादर करण्यात आला. त्यानुसार आतापर्यंत असलेली १३५६ पॅकेजेस वाढवून आता २३९९ पॅकेजेस करण्यात आली आहेत.

पॅकेज दरवाढ करताना सुवर्णमध्य साधण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, खासगी रुग्णालये तसेच खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या एकत्रित योजनेअंतर्गत माननीय मुख्यमंत्र्यांनी पाच लाख रुपयांपर्यंतच्या उपचारांची जबाबदारी या समितीवर सोपवली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

दरम्यान, हृदय प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, बोन मॅरो (मज्जारज्जू) प्रत्यारोपण तसेच TAVI व TAVR यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांसाठी ९ पॅकेजेसचे दर १० लाखांपासून २२ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासंबंधीचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या योजना एकत्रित असल्याने राज्याचा TMS 2.0 सॉफ्टवेअर स्वीकारण्यात आले आहे. सध्या सर्व रुग्णालये या प्रणालीवर कार्यरत होत असून आगामी १५ दिवस ते एक महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यामुळे योजनेतील गैरवापर तात्काळ हेरला जाईल, लाभार्थ्यांना अधिक लाभ मिळेल आणि संपूर्ण यंत्रणा अधिक पारदर्शक बनेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पॅकेज दरवाढीनंतर राज्यभर संवाद यात्रा काढून योजना शेवटच्या घटकांपर्यंत कशी प्रभावीपणे पोहोचेल, यावर चर्चा करण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत रुग्णालयांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली असून २०२० पर्यंत ९०० ते १००० असलेली संख्या आता सुमारे २५०० रुग्णालयांपर्यंत पोहोचली आहे. यासाठीचा निधीही पूर्वीच्या ५०० ते १००० कोटी रुपयांवरून थेट ५४०० कोटी रुपये करण्यात आला आहे.

दरम्यान, हॉस्पिटलचे A, B, C ग्रेड वर्गीकरण रद्द करून सर्व रुग्णालयांना समान पॅकेज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच खासगी रुग्णालयांना १५ टक्के अतिरिक्त दर, तर आदिवासी व दुर्गम भागातील रुग्णालयांसाठी आणखी १० टक्के अतिरिक्त लाभ देण्याचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.


या पत्रकार परिषदेला अप्पर जिल्हाधिकारी खंडागळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, डॉ. विशाल ज. टावरी, जिल्हा समन्वयक (राज्य आरोग्य हमी सोसायटी) इम्तियाज खान (मेडीअसिस्ट टीपीए कंपनी, जिल्हा प्रमुख) तसेच आरोग्य विभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, नवीन रुग्णालयांच्या नोंदणीसाठी आता कोणताही त्रास न घेता पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे योजनेत समावेश करण्यात येणार आहे. या सर्व उपाययोजनांमुळे आरोग्य योजनांचा गैरवापर थांबेल, पारदर्शकता वाढेल आणि सामान्य नागरिकांना अधिक सुलभ व दर्जेदार आरोग्यसेवेचा लाभ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

- **विदर्भातील मागास जिल्ह्यांकडे विशेष लक्ष दिले जात असून यवतमाळ जिल्ह्यात २४ लाख ३४ हजार लाभार्थी योजनेअंतर्गत आहेत. आतापर्यंत सुमारे ४९ टक्के आयुष्मान कार्ड काढण्यात आले आहेत. तसेच ७० वर्षांवरील नागरिकांसाठी 'वय वंदना योजना' अंतर्गत राशन कार्ड, आधार कार्ड व मोबाईल नंबर अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आयुष्मान कार्ड काढण्यासाठी अंगीकृत हॉस्पिटल, CSC सेंटर, आधार कार्ड सेंटर किंवा कोणत्याही सेतू केंद्रामार्फत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.**
- **प्रशासन व आरोग्य यंत्रणांमधील समन्वय वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. आजारपणानंतर अंधश्रद्धेमुळे उपचारात उशीर होऊ नये तसेच कागदपत्रांच्या अडचणींमुळे कोणीही योजनेपासून वंचित राहू नये, यासाठी जनजागृतीवर विशेष भर देण्यात येणार आहे.**
- **यावेळी महाराष्ट्र शासन आयुष्मान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, "ही योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष रुग्णांपर्यंत पोहोचली पाहिजे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. पॅकेज दर अनेक वर्षांपासून बदलले गेले नव्हते, त्यामुळे रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. आता पॅकेज वाढ, दरवाढ आणि TMS 2.0 प्रणालीमुळे पारदर्शकता वाढेल. कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही आणि शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार व मोफत उपचार पोहोचवण्याचा शासनाचा ठाम निर्धार आहे."**

# स्पेनमध्ये दोन रेल्वेची भीषण धडक; 42 ठार

**▸विदर्भ केसरी। मैड्रिड,**



स्पेनमध्ये एक भयानक रेल्वे अपघात घडला आहे. काही तासांपूर्वी, गार्सिया आणि तिची गर्भवती बहीण दक्षिण स्पेनमधील मालागा येथून राजधानी मैड्रिडला हाय-स्पीड ट्रेनने प्रवास करत होत्या.

त्यांच्या ट्रेनचा मागचा भाग अज्ञात कारणांमुळे रुळावरून घसरला आणि नंतर दुसऱ्या येणाऱ्या ट्रेनशी धडकला, ज्यामुळे ती जवळच्या उतारावरून खाली कोसळली. किमान ४२ लोकांचा मृत्यू झाला आणि १५० हून अधिक जण जखमी झाले, त्यापैकी काही गार्सियाच्या समोरच होते. बचाव पथकांनी तिला आणि तिच्या बहिणीला झुकलेल्या ट्रेनमधून बाहेर काढले.

स्पेनमध्ये झालेल्या रेल्वे अपघातातल्या २६ वर्षीय आना गार्सियाने अचानक एक हताश विनंती केली आणि म्हटले की तिला तिचा कुत्रा बोरो शोधण्यात मदत हवी आहे. गार्सियाने बोरोकडे थोडक्यात पाहिले, पण तो पळून गेला. वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर, लंगड्या गार्सियाने पत्रकारांना सांगितले की ती त्याला शोधण्यासाठी परत जात आहे. "कृपया, जर तुम्ही मदत करू शकत असाल तर त्याला शोधा. आम्ही कुटुंबासह आठवड्याच्या शेवटी परतत होतो आणि हा लहान कुत्रा देखील आमचा कुटुंब आहे," ती ओरडली. स्पेनमधील सर्वात मोठ्या रेल्वे अपघातांपैकी एकानंतर, बोरोला शोधण्यासाठी स्पॅनिश लोकांनी सोशल मीडियावर गर्दी केली आहे. प्रमुख स्पॅनिश माध्यमांनीही बेपत्ता कुत्र्याच्या शोधाचे वृत्त दिले आहे. हजारो लोकांनी गार्सियाच्या मुलाखतीचा व्हिडिओ शेअर केला आहे.

बोरोचे फोटो शेअर केले गेले आहेत, ज्यामध्ये तो मध्यम आकाराचा काळा कुत्रा आहे ज्याच्या छातीवर पांढरे केस आहेत आणि त्याच्या भुवया पांढरे आहेत. गार्सिया आणि तिच्या कुटुंबाचे फोन नंबर देखील सोशल मीडियावर शेअर केले गेले. असोसिएटेड प्रेस त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नाही. सोमवारी दुपारी टीव्ही ब्रॉडकास्टर टीव्हीईने अपघातस्थळाचे फुटेज दाखवले, ज्यामध्ये बोरोसारखा दिसणारा एक कुत्रा काही सेकंदांसाठी जवळच्या शेतात धावत असल्याचे दाखवले. सध्या हा परिसर तपास आणि बचाव कार्यासाठी बंद आहे. परंतु कोणीही त्या पिल्लापर्यंत पोहोचलेले नाही. स्पेनच्या प्राणी हक्क राजकीय पक्षाला गृह मंत्रालयाकडून परिघाच्या आत प्राणी बचाव पथक पाठवण्याची परवानगी मिळाली आहे.

पक्षाचे अध्यक्ष जेवियर लुना यांनी एक्स वर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये म्हटले आहे की टीम बुधवारी तेथे असेल. "मी कुटुंबाला एक संदेश पाठवू इच्छिते, तुम्हाला आशा देते... कारण मला खात्री आहे की आपण त्याला शोधू," लुना म्हणाले. या अपघातामुळे स्पेनमधील रेल्वे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, परंतु बोरोच्या शोधामुळे सोशल मीडियावर एकता आणि सहानुभूतीचा वर्षाव झाला आहे.

# तर पाच वर्षात बौद्धांची वेगळी शैक्षणिक संस्था : राजरत्न आंबेडकर

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**




शिक्षणाचे आज बाजारीकरण झाले आहे. शिक्षण व्यवस्था भांडवलदारांच्या हाती गेली. त्यामुळे सरकारी शैक्षणिक संस्था बंद पडत आहे. भविष्यात गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळेल की नाही याची खात्री नाही. यासाठी येत्या पाच वर्षात बौद्धांची वेगळी शैक्षणिक संस्था व अर्थव्यवस्था निर्माण करण्यात येईल, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू Rajaratna Ambedkar डॉ. राजरत्न आंबेडकर यांनी केले.

धम्मप्रिय सम्राट अशोकनगरी अंबानगर (सेवाग्राम) येथे Rajaratna Ambedkar डॉ. भदन्त राजरत्न यांनी आयोजित केलेल्या विदर्भस्तरीय बौद्ध धम्म परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भदन्त आनंद महाथेरो आग्रा तर अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने, धम्म परिषदेचे उद्घाटक गोल्डमॅन डॉ. रोहित पिसाळ, भदन्त सत्यानंद महाथेरो येनाळा, भदन्त डॉ. मेत्तानंद महाथेरो, भदन्त प्रज्ञाशील महाथेरो, भदन्त अरुणज्योती महाथेरो कोलकत्ता, भदन्त करुणाबोधी महाथेरो नागपूर, भदन्त बुद्धश्री महाथेरो मुंबई, भिक्षूसंघ, डॉ. राजा टाकसाळे, अनिल जवादे, प्राचार्य देवराव गजभिये, विभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर, डॉ. राजकुमार शेंडे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष विशाल मानकर, चित्रपट कार्यकारी निर्माता चरण हरले, युवा प्रबोधनकार प्रणोज बनकर, डॉ. कल्पना कांबळे, डॉ. विकास साठे, नितीन गजभिये, राजीव वानखेडे आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने यांनी, आज बुद्धाचे विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञानच जगाला तारू शकते असे विचार व्यत केले. भदन्त सत्यानंद महाथेरो यांनी बुद्धाने दिलेला विज्ञानवादी बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार हा विहारातून झाला पाहिजे. विहार ही ज्ञानाची केंद्र झाली पाहिजे. बुद्ध विहार केवळ धम्माचे केंद्र नाही तर वाचनालय झाले पाहिजे, असे विचार व्यत केले. डॉ. रोहित पिसाळ यांनी प्रत्येकाला नोकरी मिळणारच असे नाही, त्यासाठी युवकांनी पुढे येऊन स्वयंरोजगार निर्माण करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

धम्म परिषदेमध्ये मॉनेस्ट्रीसाठी जमीन दान देणारे डॉ. राजाभाऊ टाकसाळे आणि अनिल जवादे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रमेश वानखडे, डॉ. राजकुमार शेंडे, प्राचार्य देवराव गजभिये, प्रमोज बनकर, सुशीला भगत, सुकेशनी जामगडे आदींची विचार व्यत केले. संचालन सुनील ढाले, प्रास्ताविक बौद्ध धम्म परिषदेचे आयोजक डॉ. भदन्त राजरत्न यांनी केले. तर आभार मुख्याध्यापक मुकुंद नाखले यांनी मानले. यशस्वीतेसाठी नीरज ताकसांडे, सुहास थूल, देवानंद बोरकर, भगवान वनकर, शैलेश मानकर, सुशील व प्रशील पाटील, दिनेश वाणी, इंजि. राजेश खडसे, आदींनी सहकार्य केले

# वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे शेतकरी त्रस्त

## शेतकरी संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्लाबोल
## नरकाळा महोत्सव बहिष्काराचा शेतकरी संघटनेचा इशारा,

**▸विदर्भ केसरी। अकोला जिल्हा प्रतिनिधी : पूर्णाजी खोडके**




अकोला : जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी, शेतमजूर व आदिवासी नागरिक अक्षरशः भयभीत झाले असून शेती, जनावरे व मानवी जीवनाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र या गंभीर प्रश्नाकडे वनविभाग व प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात आक्रमक निवेदन सादर करण्यात आले. शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कोंठकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व आदिवासी महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन वन्यप्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीची वस्तुस्थिती प्रशासनासमोर मांडली. जिल्ह्यातील ग्रामीण भाग व सातपुडा पायथ्यालगतच्या परिसरात रानडुक्कर, नीलगाय, हरण, वानर व जंगली कुत्रे यांचा सुळसुळाट झाला असून शेती मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त होत आहे. रात्री शेतात जाणे अशक्य झाले असून अनेक गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे...

२०२४–२५ या कालावधीत अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पीक नुकसान झाले असतानाही नुकसानभरपाई अत्यल्प व विलंबाने मिळत आहे. वन्यप्राणी थेट मानवी वस्तीत शिरू लागल्याने महिला व लहान मुलांमध्ये दहशत निर्माण झाली आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.. वन्यप्राण्यांचा प्रश्न गंभीर असताना प्रशासन केवळ महोत्सव साजरे करण्यात व्यस्त असल्याचा आरोप करत, ३० सप्टेंबर रोजी नरकाळा महोत्सवावर बहिष्कार टाकण्याचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कोंठकर यांनी प्रशासनाला दिला आहे.... यावेळेस,तालुका अध्यक्ष निलेश नेमाडे अकोट तालुका अध्यक्ष दिनेश गिन्हे व रामकिशोर थुटे, जाफर खा अहमद खा, सुरेश सोनोने, मकसुद मुल्ला जी, मोहन खिरोडकार, अफजल भाष्कर, नदीमोद्दिन करीमोद्दीन, गोपाल निमकर्डे आदी उपस्थित होते.... अशी माहिती शेतकरी विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कोठकर, यांनी दिली आहे... या प्रकरणी जिल्हाधिकारी वर्षा मीना व प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे..

**प्रमुख मागण्या :**

- **वन्यजीव कायद्यानुसार ग्रामपंचायत स्तरावर तातडीचे अधिकार देण्यात यावेत, मानव व शेतीस धोका ठरणाऱ्या वन्यप्राण्यांवर नियंत्रणासाठी विशेष तांत्रिक उपाययोजना राबवाव्यात, वनविभाग हद्दीलगत संरक्षण भिंती व कुंपण उभारण्यात यावे तसेच शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानभरपाई अदा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे...**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## जुन्या वादातून जीवघेणा हल्ला

■ यवतमाळ : अवधूतवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी हर्ष गजानन कांबळे आणि त्याचा मित्र योगेश देवतळे हे १९ जानेवारी रोजी रात्री १० च्या सुमारास आर्णी रोडवरील राजदूत वाईंन शॉप येथे गेले होते. तिथे आरोपी तेजस भेंडारकर, प्रथमेश भागवत, कनिष्ठ खरतडे, सौरभ पंडागळे आणि रोहित मानकर यांनी त्यांना गाठले. 'तू मर्डर केसमध्ये आमच्या विरुद्ध रिपोर्ट का दिला?' असा जाब विचारत आरोपींनी बेकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादीवर लोखंडी कोयत्याने वार केला. स्वतःचा बचाव करताना फिर्यादीच्या हाताची बोटे कापली गेली आणि गुडघ्यावर गंभीर दुखापत झाली.

## महत्त्वाचे

### देशी कट्टा घेवून फिरणारा अटक; दोन जिवंत काडतूस, चाकू जप्त

▶विदर्भ केसरी।

देशी कट्टा घेवून फिरणाऱ्या एका तरूणाला एलसीबी पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून एक देशी कट्टा, दोन जिवंत काडतूस आणि एक धारदार चाकु जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शहरातील अवधुतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाघाडी मार्गावर एलसीबी पथकाने पार पाडली असून या प्रकरणी विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. अजिंक्य विनोद नाचपेलवार वय २७ वर्ष असे ताब्यात घेण्यात आलेल्या तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, शहरातील वाघाडी मार्गावर एक तरूण त्याच्या मोपेड वाहनामध्ये देशी कट्टा घेवून फिरत होता. याबाबतची गोपनीय माहिती एलसीबी पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळाली. त्यावरून रविवारी रात्रीच्या सुमारास पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सापळा रचून त्या तरूणाला ताब्यात घेतले. दरम्यान त्याच्या मोपेड वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये देशी कट्टा, दोन जिवंत काडतूस आणि एक धारदार चाकू आढळून आला. या प्रकरणी अवधुतवाडी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी त्या तरुणाविरोधात विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. ही कारवाई एलसीबी प्रमुख पोलिस निरीक्षक अति चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील सहायक पोलिस निरीक्षक मनिष गावंडे, पोलिस उपनिरीक्षक गजानन राजमलू, पथकातील योगेश गटलेवार, प्रशांत हेडाऊ, रूपेश पाली, योगेश डगवार, स्कीन घुगे, सुनील पैठणे, आकाश सहारे, देवेंद्र होले, आकाश सूर्यवंशी यांनी पार पाडली. दिग्रस शहरात एका सराईत गुन्हेगाराला बेकायदेशीर देशी बनावटीचे पिस्तुल आणि जिवंत काडतुसांसह रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, दि. १९ जानेवारीला स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिग्रस परिसरात गस्तीवर असताना, मो. आसिम मो. अबजल नावाचा व्यक्ती कंबरेला पिस्तुल लावून दिग्रस-आर्णी बायपासवरील हिंदू स्मशानभूमीजवळ उभा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी स्मशानभूमी परिसरात वेढा घातला. संशयास्पद स्थितीत बसलेल्या आसिमची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक देशी बनावटीचे स्टिल सदृश पिस्तुल, दोन जिवंत काडतुसे असा एकूण ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. शस्त्राबाबत कोणताही परवाना नसल्याने पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध दिग्रस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नगरपंचायत सभापतीपदांची तिन्ही पक्षामध्ये झाली समतोल विभागणी

▶विदर्भ केसरी। मालेगाव

नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांच्या सभापतिपदासाठी सोमवारी दि. १९ रोजी झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी शिंदेसेनेला दोन, तर भाजप व काँग्रेसला प्रत्येकी एक सभापतिपद मिळाले आहे. यामुळे नगरपंचायतीच्या कारभारात सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित झाले असून राजकीय समतोल साधला गेल्याने तिन्ही पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समाधानतेचे वातावरण दिसून येत आहे. नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिंदेसेनेचे ओमप्रकाश खुरसडे यांची नगराध्यक्षपदी, तर राधा महादेव खवले यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर विषय समित्यांच्या सभापतिपदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते

# झेडपी निवडणुकीसाठी 'महाआघाडी तयार'

▶विदर्भ केसरी। पुणे,

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी यांच्यात अधिकृत आघाडी झाली आहे. या महत्त्वाच्या आघाडीची घोषणा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीरंग पाटील आणि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सचिव तथा पुणे जिल्हा समन्वयक ॲड. प्रियदर्शी तेलंग यांनी पत्रकार परिषदेत केली. आघाडीने जिल्हा परिषदेसाठी एकूण ७३ जागा आणि पंचायत समितीच्या १४६ जागांवर संयुक्तपणे उमेदवार उभे करण्याचा निर्धार केला आहे.



आघाडीच्या अंतर्गत उमेदवार निवडीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक नेतृत्वाने सुरुवातीला व्यापक चर्चासत्रांचे आयोजन केले आहे. यामध्ये प्रत्येक तालुक्यातील स्थानिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून संभाव्य उमेदवारांची नावे सुचवली गेली असून, जिल्हा पातळीवर दोन्ही पक्षांच्या प्रमुखांनी या यादीला अंतिम मान्यता दिली आहे. उमेदवारी अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्या जागा कोणत्या पक्षाकडे असतील, याची अधिकृत माहिती जाहीर केली जाईल, असे श्रीरंग पाटील आणि ॲड. प्रियदर्शी तेलंग यांनी सांगितले.

काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या या महाआघाडीचे मुख्य उद्दिष्ट फक्त सत्ता मिळवणे नसून, संविधानविरोधी आणि जातीवादी शक्तींना रोखणे आहे. सामाजिक न्याय आणि बहुजन, वंचित, शोषित घटकांच्या हक्कासाठी एकजुटीने काम करणे हा या आघाडीचा प्रमुख दृष्टिकोन आहे. या संदर्भात श्रीरंग पाटील आणि ॲड. प्रियदर्शी तेलंग यांनी स्पष्ट केले की, यांचे मुख्य उद्देश्य सामाजिक न्यायाच्या विचारधारेला बळकट करणे आणि जातिवादाच्या विरोधात ठामपणे उभे राहणे आहे.

■ यावेळी प्रदेश कॉंग्रेसचे खजिनदार ॲड. अभय छाजेड, जिल्हा परिषदेसाठी नियुक्त केलेले निरीक्षक प्रशांत जगताप, वंचित बहुजन आघाडीचे विशाल गवळी व इतर पदाधिकारी उपस्थित होते. काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या या ऐतिहासिक आघाडीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये महत्त्वाचे परिणाम साधता येण्याची आशा आहे. यामुळे पुणे जिल्ह्यातील बहुजन, वंचित आणि शोषित समाजासाठी एक मजबूत आणि प्रभावी प्रतिनिधित्व उभे राहणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. उमेदवारी अर्ज प्रक्रिया आणि इतर निवडणूक संबंधित माहिती लवकरच जाहीर केली

# अकोला जिल्हा खेळाडूंची चमकदार कामगिरी



▶विदर्भ केसरी। मूर्तिजापुर -

मणेराजुरी ता. तासगाव, जि. सांगली येथील श्री लक्ष स्कूलच्या मैदानावर दिनांक १७ ते १९ जानेवारी दरम्यान शालेय राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसीय स्पर्धेत राज्यभरातून सुमारे ३५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सांगली किरण बोराडेकर यांनी दिली. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोराडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी थाय बॉक्सिंग असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष पाशा अत्तार यांच्या हस्ते क्रीडा अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अमरावती विभागाचे थाय बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष तथा मूर्तिजापुरच्या एम बी कराटेचे संचालक सेन्सई गंगाधर जाधव यांनी आपल्या विभागातील संघासह स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत अकोला जिल्ह्याच्या मूर्तिजापूर शहरातील व तालुक्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. १७ वर्षे वयोगटात श्रावस्ती पंडित, नंदीनीवरोकार, अंकुश कनोजे यांनी ब्रॉंझ पदकाची कमाई केली. तसेच अंशुमनसरोदे, विनयजामनिक, राणी जाधव, अक्षराठाकरे, मधुरालोडम, आदित्य बोळे यांनीही उत्तम खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेत सहभाग घेतला. १९ वर्षे वयोगटात अकोला जिल्ह्याचा शिवम डहाके याने स्पर्धेत सहभाग नोंदवत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. अकोला जिल्ह्यातील खेळाडूंच्या या कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रात समाधान व्यक्त करण्यात येत असून, भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरणार आहे.

# नेहरू महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रमाचे आयोजन

▶विदर्भ केसरी।

**यवतमाळ**: मराठी भाषेच्या विविध बोलींचे जतन संवर्धन करण्याच्या उद्देशाने भाषा संचालयनालय मुंबईच्या वतीने महाराष्ट्रात ३६ जिल्हे ३६ कार्यक्रम होणार आहेत.त्यापैकी यवतमाळ जिल्हयातून नेर येथील नेहरू महाविद्यालयात दिनांक २३जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग,भाषा संचालनालय मुंबई,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व नेहरू महाविद्यालय मराठी विभाग नेर यांच्या संयुक्त विद्यमाने "मराठी भाषा पंधरवडा २०२६ "अंतर्गत कोलामी व आंध या बोलींचा जागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नेहरू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.परमानंदजी अग्रवाल हे आहेत तर उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच विद्यापीठाचे पदव्युत्तर मराठीचे प्रा.डॉ.माधव पुटवाड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कोलामी बोलीचे अभ्यासक प्रा. घन:श्याम दरणे तसेच आंध बोलीचे आभ्यासक डॉ.गजानन लोहवे हे वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. सहाय्यक,भाषा संचालक मुंबई, येथील मा.संतोष गोसावी,मा.श्री. जनार्दन पाटील, अनुवादक,महाराष्ट्र शासन यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सकाळी ग्रंथदिंडीने या बोलीजागरला प्रारंभ होणार असून त्यानंतर ९.३० वाजता उद्घाटन समारंभ होणार आहे.

# सिरसोच्या लेकी पुस्तकाचे थाटात प्रकाशन

## ग्रामीण महिलांच्या संघर्षगाथेला शब्दरूप

▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर :-

ग्रामीण भागातील कष्टकरी, जिद्दी आणि स्वाभिमानी महिलांच्या जीवनप्रवासावर आधारित विजय हरणे लिखित “सिरसोच्या लेकी” या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या हस्ते वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद व मुकबधीर बेवारस बालगृहात १४ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. या पुस्तकात सिरसो येथील महिलांच्या संघर्ष, यशकथा, सामाजिक योगदान व प्रेरणादायी प्रवासाचा सखोल वेध घेण्यात आला आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.



प्रकाशनप्रसंगी बोलताना शंकरबाबा पापळकर सांगितले की, “सिरसोच्या लेकी” हे पुस्तक केवळ साहित्यिक दस्तऐवज नसून ग्रामीण महिलांच्या जिवंत अनुभवांचे प्रतिबिंब आहे. या पुस्तकामुळे ग्रामीण महिलांचे प्रश्न, त्यांची ताकद आणि समाजातील योगदान व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे. या पुस्तकात शिक्षण, शेती, कुटुंब जबाबदाऱ्या, स्वावलंबन, शासकीय नोकरी स्वयंरोजगार, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांच्या कहाण्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अनेक महिलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळवले असून त्यांच्या प्रेरणादायी कथा वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. कार्यक्रमात उपस्थित वक्त्यांनी महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले. महिलांचे अनुभव शब्दबद्ध करून पुढील पिढीसाठी जतन करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पुस्तकाचे लेखक विजय हरणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, या पुस्तकामागील उद्देश सिरसो परिसरातील महिलांच्या कर्तृत्वाला न्याय देणे हा आहे. अनेक महिलांच्या मुलाखती, प्रत्यक्ष अनुभव आणि सामाजिक कार्याचा अभ्यास करून हे पुस्तक साकार करण्यात आले आहे. कार्यक्रमास आश्रमाच्या मुख्य सेविका काळे मॅडम या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या त्याच बरोबर सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी, महिला हरणे कुटुंबातील सदस्यांसह नागरिकांची मोठी उपस्थिती होती. उपस्थितांनी पुस्तकाचे स्वागत करत या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे लेखक विजय यांनी आभार मानले प्रकाशन सोहळ्याचे नियोजन विमल हरणे, गजेंद्र हरणे, कविता हरणे यांच्या वतीने करण्यात आले.

# हळदी कुंकू तसेच विविध कार्यक्रमाला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद !

▶विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर

बाळापूर : तालुक्यातील वाडेगाव येथील महात्मा फुले युवा प्रतिष्ठान महिला आघाडी कडून आयोजित हळदी कुंकू तसेच विविध कार्यक्रम नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले . कार्यक्रमात हळदी कुंकू समारंभाचे औचित्य साधून समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला भगिनींचा सत्कार करण्यात येवून सन्मानित करण्यात आले. महिलांना भविष्यात आपले कार्य करण्यास आदर्श भेटेल तसेच महिलांना सामाजिक व्यासपीठ उपलब्ध होईल , त्याअनुषंगाने डॉ वरदा घाटोळ यांचा तसेच आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत



असलेल्या हरी भक्त पारायण कु.साक्षी महाराज धनोकार सह आदींचा सत्कार करण्यात येवून सन्मानित करण्यात आले ,तसेच महिलांसाठी वेगवेगळे इनडोअर खेळ आयोजित करण्यात आले त्या मध्ये महिलांनी स्वयंस्फूर्ती ने मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. तसेच हळदी कुंकू कार्यक्रम पार पडला त्यावेळी सूत्र संचालन सौ पल्लवी धनोकर यांनी केले ,प्रास्ताविक डॉ मनीषा भुस्कुटे यांनी केले , तर सौ माया मसने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन सौ मोनल मसने यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन व परिपूर्णतेसाठी महिला आघाडी च्या सौ अपेक्षा जढाळ ,सौ योगिता सोनटक्के ,सौ सोनाली घाटोळ ,सौ कांचन पिंपळे ,सौ भाग्यश्री मसने ,सौ वैष्णवी घाटोळ ,सौ भावना हांडे , सौ अश्विनी मसने ,सौ प्रांजली सोनटक्के ,सौ राजश्री घाटोळ ,सौ रेखा मसने ,सौ आरती काळे ,सौ प्रियांका घाटोळ ,सौ वैष्णवी काळे ,सौ सोनल धानोकर ,सौ हर्षा हुसे ,सौ प्रियका मसने यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# संस्कार भारती व अर्बन बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने भव्य रांगोळी स्पर्धा

▶विदर्भ केसरी। यवतमाळ,

रंगमंच व ललित कलांच्या संवर्धनार्थ कार्यरत संस्कार भारती यवतमाळ जिल्हा शाखा तसेच दि यवतमाळ अर्बन को ऑप. बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने भारतमाता पूजनानिमित्त भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'पर्यावरण' या विषयाला अनुसरून आयोजित ही रांगोळी स्पर्धा नि:शुल्क व सर्वांसाठी खुली आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळात यवतमाळ अर्बन बँकेचे मुख्य कार्यालय, एलआयसी चौक, गार्डन रोड येथे होईल. स्पर्धेतील विजेत्यांना २१०० रुपयांचे प्रथम, १५०० रुपयांचे द्वितीय तर ११०० रुपयांचे तृतीय अशी पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ प्रजासत्ताक दिनी, २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजून 30 मिनिटांनी यवतमाळ अर्बन बँकेच्या मुख्य कार्यालय परिसरात होईल. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी संयोजक प्रदीप गज्जलवार (७०६६९९७४०९), सहसंयोजक आयुषी कार्लेकर ( ९०९६३६६९९८) किंवा संघटनेच्या उपाध्यक्ष शालिनी साठे (९९२२४२१०७७) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन संस्कार भारती यवतमाळच्या अध्यक्ष प्राची बनगीनवार, मंत्री कमलेश मुंदेकर, यवतमाळ अर्बन बँक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मनोज बोनगीरवार व सचिव अर्जुन खर्चे यांनी केले आहे.

# अनोख्या पद्धतीने हळदी कुंकू कार्यक्रम

▶विदर्भ केसरी। कळंब तालुका (प्रतिनिधी): विरेंद्र चव्हाण

कळंब:' मकर संक्रांतीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या उत्सवात सावित्रीबाई फुले. मा. ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तके वाणात देऊन साजरा केला. आणि वातावरणात आनंद, उत्साह आणि संस्कृतीचा सुगंध पसरला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. मकर संक्रांतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी भोगी गीत, सांस्कृतिक नृत्य, गाणी व भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः पारंपरिक सणाचे महत्त्व, आपुलकी, एकोप्याची भावना आणि निसर्गाशी नाते जपण्याचा



संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. सणाचे औचित्य साधत तीळगूळ वाटप केले. सर्व मेटीखेडा परिसरातील महिलांना या निमित्ताने निमंत्रित करण्यात आले होते व त्यांना वाण देऊन विविध खेळात व मनोरंजनपर कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित महिला मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, परंपरा आणि संस्कृतीची जाणीव निर्माण होत असून सोबतच सांस्कृतिक जडणघडणीतही मोलाचे कार्य करत असल्याचे या कार्यक्रमातून दिसून आले.कार्यक्रमास सौ. कल्पनाताई वसंतराव पुरके, सौ.गायत्रीताई नवाडे, सौ.अर्चनाताई हजारे, सौ.आडे, सौ.कुंदा विजय सरोदे, पद्मिनी विशाल सरोदे व इतर मान्यवर तसेच गावकरी महिला उपस्थित होत्या.

# ...तर 27 जानेवारीपासून तहसीलसमोर आमरण उपोषण

## दलित कुटुंबीयांना भूमिहीन करून फसवणूक केल्याने संबंधितावर ॲट्रॉसिटी नुसार गुन्हे नोंद करण्याची मागणी

▶विदर्भ केसरी। प्रतिनिधी महागाव, शेरखान पठान

डोंगरगाव ता. महागांव येथील बौद्ध समाजातील विमल बबन हाडशे तसेच हिरामण शंकर हाडशे या शेतकऱ्यांना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची संपूर्ण जमीन हडप करण्यात आली. भोगवटदार क्रमांक दोनची जमीन एक करून हाडशे कुटुंबीयांना नाममात्र मोबदला देऊन ती जमीन तायरखा रहीमखा पठाण यांनी वैशाली श्रीकांत उपलेंचवार यांना विकली. सदर जमीन अल्पावधीतच दीड कोटी रुपयाला जीएनआय इंफास्ट्रक्चर लि. औरंगाबाद या कंपनीला विकण्यात आली. यामध्ये बौद्ध समाजाच्या कुटुंबीयांच्या अज्ञानाचा फायदा घेत



फसवणूक करण्यात आली. संबंधित कुटुंबीयांना न्याय मिळावा याकरिता त्यांच्या वतीने सय्यद मुदसिर सय्यद जमील यांनी हे संबंधितांना त्वरित न्याय न मिळाल्यास 27 जानेवारीपासून तहसील कार्यालया समोर उपोषणास बसणार असल्याचा प्रशासनास गर्भित इशारा दिला आहे.

जीएनआय इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने डोंगरगाव येथील शेत सर्वे नं. 138 क्षेत्रफळ 4.00 हे.आर. मध्ये गिट्टीक्रेशर खदान हा प्रचंड कारखाना सुरू केला आहे. गरीब अशिक्षित मागासवर्गीय असलेल्या हिरामण हाडसे व त्यांच्या कुटुंबातील नागरिकांना भूमीहीन करून त्यांची जमीन मोठ्या किंमतीमध्ये इतरांना विकण्यात आली. हाडशे कुटुंबाच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अधिकारी व कंपनीच्या संबंधितांनी एक प्रकारे



मागासवर्गीय कुटुंबीयांची फसवणूक केली असल्याचा आरोप सय्यद मुदसिर सय्यद जमाल यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांना दिलेल्या निवेदनातून नमूद केले आहे. शेतकरी हिरामण हाडसे यांची या प्रकारामुळे प्रकृती खालावली आहे. त्यामुळे या दलित शेतकरी कुटुंबीयांनी सय्यद मुदशीर सय्यद जमाल यांना न्यायालयीन व इतर शासकीय कामानिमित्ताने येणाऱ्या सर्व गोष्टी करण्यासाठी मुक्त्यारपत्र दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वतीने लढण्याचा अधिकार प्राप्त झाला. करिता संबंधित प्रकरणांमध्ये फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना त्यांची जमीन त्यांना परत मिळवून देण्यासाठी 26 जानेवारी पासून महागाव तहसील कार्यालयाच्या समोर समोर उपोषण बसणार असल्याचे प्रशासनाच्या निर्देशनास आणून दिले आहे. गिट्टीक्रेशर कंपनी कारखाना तात्काळ बंद करण्यात यावा. बौद्ध समाजाच्या अशिक्षित शेतकऱ्याची फसवणूक झालेल्या प्रकरणात ज्या शासकीय व निमशासकीय अधिकाऱ्यांचा सहभाग आलेला आहे, त्या सर्वावर ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल व्हावेत, ही मागणी घेऊन 27 जानेवारी 2026 पासून सय्यद मुदसिर सय्यद जमाल सामाजिक कार्यकर्ते डोंगरगाव हे महागाव तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारती समोर उपोषणास बसणार असल्याचे कळते. या प्रकरणांत ताहेरखान रहीमखान पठाण, वैशाली श्रीकांत उपलेंचवार, जीएनआय इन्फोक्रस्ट्रक्शन लि. औरंगाबाद, जिल्हाधिकारी यवतमाळ, उपविभागीय अधिकारी उमरखेड, तहसीलदार महागाव, दुय्यम निबंधक अधिकारी महागाव, मंडळ अधिकारी मोरथ,तलाठी डोंगरगाव यांना गैरअर्जदार करण्यात आले.

# उमेदवारांना इलेक्ट्रॉनिक जाहिरातींचे प्रमाणीकरण बंधनकारक

▶विदर्भ केसरी। परभणी :

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांसह राजकीय पक्षांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जाहिराती प्रसारित करण्यापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणीकरण करून घेणे बंधनकारक आहे. यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिता भालेराव, उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, शैलेश लाहोटी, उदयसिंह भोसले, संगीता चव्हाण, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) विद्या मुंढे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शोभादेवी जाधव उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार दूरदर्शन, उपग्रह व केबल वाहिन्या, यूट्यूब चॅनेल, केबल नेटवर्क, आकाशवाणी, खासगी एफएम वाहिन्या, चित्रपटगृह, सार्वजनिक ठिकाणचे दृक्श्राव्य फलक, ई-वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉइस एसएमएस, समाज माध्यमे व संकेतस्थळांवरील निवडणूक जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण आवश्यक आहे असे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी सांगितले.



## ठाकरे शिवसेना गटनेतेपदी किशोरी पेडणेकरांची निवड

मुंबई : माजी महापौर आणि नगरसेविका किशोरी पेडणेकर ( Kishori Pednekar) यांची आज (दि. २१) शिवसेना ठाकरे गटाच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. किशोर पेडणेकर यांच्या मुंबई महानगरपालिकेतील अनुभववावर विश्वास दाखवत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्याकडे महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे.

## महत्त्वाचे

### नागपुरात पेट्रोल पंप चालकाच्या घरातून 1 कोटीचे हिरे : 247 तोळे सोने चोरीला

**विदर्भ केसरी।**

शहरात पेट्रोल पंप चालकाच्या बंगल्यातून अज्ञात चोरट्याने लाखो रुपयांची रोकड, हिरे,सोन्याचे दागिने चोरून नेले आहेत. विशेष म्हणजे सीसीटीव्ही झाकून ही चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने ६५ लाख रोख, १ कोटी रुपयांचे हिरे व २४७ तोळे सोन्यावर हात साफ केला आहे. शिर्के लेआऊट येथील रहिवासी बलजिंदरसिंग इंद्रजितसिंग नय्यर (५६) आणि त्यांचा भाऊ शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय करतात. सोमवारी सायंकाळी बलजिंदरसिंग यांच्या धाकट्या मुलाचा साखरपुडा होता. कुटुंबातील सदस्य तिकडे गेले होते. चोरट्याने या संधीचा फायदा घेत मध्यरात्री स्वयंपाकघरातील खिडकीचे ग्रील तोडून आत प्रवेश केला. बलजिंदर यांच्या घरात कपाटाचे कुलूप तोडून २४७ सोन्याचे तसेच १ कोटीचे हिऱ्यांचे दागिने, रोख रक्कम पळवली.

### सीसीटीव्ही झाकला तरीही एका कॅमेऱ्यात चोरटा कैद

मुलाचा साखरपुडा असल्याने बलजिंदर यांच्या कुटुंबीयांपैकी घरी कुणीही नव्हते. चोरट्याने घरात प्रवेश करण्यापूर्वी सीसीटीव्ही झाकून टाकला होता. मात्र सीसीटीव्ही झाकल्यानंतरही अन्य एका कॅमेऱ्यात आरोपी गुन्हा करताना कैद झाला. जप्त केलेल्या फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू आहे.

### जिल्हा परिषदेसाठी भाजपविरुद्ध सर्वपक्षीय आघाडीच्या

**विदर्भ केसरी। सांगली :**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी निवडणुकीत एकीकडे स्वतंत्र लढण्याच्या दृष्टीने व्यूहरचना सुरू असताना दुसरीकडे आघाडीच्या चर्चाही जोरात सुरू आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवारी सेमिफायनलचा दिवस असतानाही आघाडी किंवा युतीचा निर्णय झालेला नव्हता. सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांमध्ये दिवसभर चर्चेच्या फेऱ्या आणि बैठका सुरू होत्या. भाजपविरोधात सर्व पक्ष एकत्र येऊन आघाडी उभी करण्याच्या दृष्टीने चर्चेची दिशा आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी एकच दिवस शिल्लक असतानाही मंगळवारी सायंकाळपर्यंत कोणत्याही पक्षाची उमेदवार यादी जाहीर झालेली नव्हती. सर्वच पक्षांनी मुलाखतींची प्रक्रियाही पूर्ण केलेली नाही. इच्छुकांना निर्णय न दिल्याने त्यांच्यात संभ्रमावस्था आहे. पक्षांनी त्यांना ताटकळत ठेवले आहे. उमेदवारी निश्चित असलेल्या इच्छुकांना प्रचाराची सुरुवात करण्याचे अनधिकृत निरोप दिले आहेत. सर्वच पक्षांनी प्रसंगी स्वतंत्र लढण्याची तयारी ठेवली आहे. त्याच वेळी आघाडीसाठीही वाटाघाटी सुरू केल्या आहेत. त्या दृष्टीने सोमवारी दिवसभर राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस नेत्यांच्या बैठका सुरू होत्या. आघाडी किंवा युती झाल्यास पक्षांच्या वाट्याला कमी जागा येतील. परिणामी असंतुष्टांना आवर घालण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. आघाडीचे नेमके चित्र सोमवारीच स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून काँग्रेससोबत हातमिळवणीची शक्यता आहे. भाजपची वाटचाल सध्यातरी 'एकला चलो रे'च्या दिशेने असल्याचे दिसत आहे. महापालिका निवडणुकीत स्वतंत्र लढल्यानंतर बहुमतात गेलेल्या भाजपने जिल्हा परिषदेसाठीही महापालिकेचाच पॅटर्न राबवायचे ठरवल्याची चिन्हे आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मात्र एकत्र येणार असल्याचे संकेत वरिष्ठांकडून मिळत आहेत. शिंदेसेना आणि जनसुराज्य पक्षांचेही उमेदवार रिंगणात उतरणार आहेत.

### अन्यथा तहसीलदार, पोलिस ठाणेदारावर कारवाई करा - खा. अशोक चव्हाण

**विदर्भ केसरी। नांदेड :**

नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, नायगाव, लोहा, उमरी व नांदेड तालुक्यातील गोदावरी घाटात वाळूमाफियांनी हैदोस घातला आहे. वाळूमाफियांची गुंडगिरी दिवसेंदिवस वाढत असून त्यांची दहशत मोडीत काढली पाहिजे तसेच ज्या भागात अवैध वाळू उपसा सुरू आहे त्या भागातील तहसीलदार आणि पोलिस ठाणेदारावर कारवाई झाली पाहिजे, अशी तीव्र प्रतिक्रिया खासदार अशोक चव्हाण यांनी व्यक्त केली. मुदखेड तालुक्याच्या हरितपट्ट्यासहित जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील गोदावरी घाटातून राजरोसपणे वाळूचा अवैध उपसा सुरू आहे. हायवाच्या धडकेत जिल्ह्यात झालेल्या अपघातात पाच नागरिकांचा मृत्यू झाला. यानंतर मुदखेड शहरात नागरी मोर्चा निघूनही तालुक्यासहित जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा बंद झालेला नाही. मुदखेड तालुक्यात कायमस्वरूपी वाळू उपशाला बंदी असताना खुजडा, वासरी, टाकळी, शंखतीर्थ, महाटी येथे वाळू उपसा सुरूच आहे. मध्यंतरी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी शंखतीर्थ घाटावर भेट दिली असता, घाटावरून महाकाय बोटी वासरी घाटावर पसारही झाल्या. हीच परिस्थिती उमरी व लोहा तालुक्यातील गोदावरी घाटावरही असून वारेमाप वाळू उपशाने गोदावरीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. खा. अशोक चव्हाण यांच्या सूचक वक्तव्यानंतर मुदखेड, उमरी आणि लोहा तालुक्यातील वाळूमाफियांच्या कायमस्वरूपी मुसक्या आवळल्या जातील का? हेच आता पाहावे लागेल. मुदखेड तालुक्यात तर वाळूमाफियांचे सिंडीकेट असल्याचे बोलले जाते. त्यामुळे येथील वाळूमाफियांचे अर्थपूर्ण संबंधावर मोठ्या चर्चा सुरू असतात. हरितपट्ट्यातील शंखतीर्थ, वासरी येथून पुन्हा वाळू उपसा झाल्यास महसूल कर्मचाऱ्यावर कारवाईचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आता शंखतीर्थ येथून वाळू उपसा बंद झाला असला तरीही वासरी, महाटी, खुजडा येथून मात्र छुप्या पद्धतीने वाळू उपसा सुरूच असल्याने कोणकोणत्या अधिकाऱ्यावर कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अंधारात चाले काळी कामे

## खानापूर परिसरात रात्रीच्या अंधारात गौण खनिजांची खुलेआम लूट

**विदर्भ केसरी। कारंजा**

खानापूर परिसरात रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत मोठ्या प्रमाणावर अवैध मुरुम उत्खनन व वाहतूक सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे, याकडे महसूल विभागाचे कमालीचे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

खानापूर हे गाव सध्या "गौण खनिजांचे गाव" म्हणून ओळखले जाऊ लागले असून, येथे तहसील प्रशासनामार्फत एका मुर्तीजापुर येथील अग्रवाल या ठेकेदाराला उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे. मात्र ही परवानगी फक्त दिवसा उत्खनन व वाहतूक करण्यापुरती मर्यादित असताना, संबंधित ठेकेदार रात्री उशिरापर्यंत उत्खनन व वाहतूक करत असल्याचे स्पष्ट पुरावे समोर आले आहेत.



**■ रात्रीच्या काळोखात जेसीबी व टिप्परचा धुमाकूळ**

परवानगीचा भंग करत रात्रीच्या वेळेस जेसीबी आणि तीन टिप्परच्या सहाय्याने मुरुमाची मोठ्या प्रमाणावर चोरी सुरू असल्याचे फोटो व पुरावे उपलब्ध झाले आहेत. याबाबतची माहिती महसूल प्रशासनाला तसेच संबंधित तलाठ्यांनाही देण्यात आली आहे. तरीदेखील, प्रत्यक्ष कारवाईचा अभाव हा अनेक प्रश्न उपस्थित करणारा ठरत आहे.

**■ परवानगीपेक्षा अधिक खोदकाम – नियमांची पायमल्ली**

ज्या ठिकाणी उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे, त्या ठिकाणी परवानगीपेक्षा कितीतरी पटीने अधिक खोदकाम करण्यात आल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून समोर आले आहे. मोजमाप न करता आणि नियम धाब्यावर बसवून सुरू असलेला हा प्रकार 'अंधेरी रात मे खेल' असल्याचेच चित्र निर्माण करतो.

**■ या गंभीर प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष केंद्रित करावे, संबंधित उत्खनन स्थळाचे तांत्रिक मोजमाप पूर्ण होईपर्यंत गौण खनिजांची वाहतूक तात्काळ थांबवावी, अशी ठाम मागणी होत आहे. तसेच रात्रीच्या वेळेस अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या जेसीबी व तीन टिप्परवर जप्तीची कारवाई करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा जनतेत तीव्र संताप उसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**प्रश्न एकच आहे –**

**नियम मोडणाऱ्यांना संरक्षण कोणाचे? आणि महसूल विभाग नेमका कोणाच्या बाजूने उभा आहे? ही बाब केवळ खानापूरपुरती मर्यादित न राहता, संपूर्ण तालुक्यातील गौण खनिज घोटाळ्याचे संकेत देणारी ठरत असून, आता प्रशासन खरोखर कारवाई करणार की पुन्हा डोळेझाक करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# महापौरपदासाठी रस्सीखेच

**विदर्भ केसरी। चंद्रपूर**

महापालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला असून हा पक्ष बहुमतापासून केवळ ४ जागा दूर आहे. मात्र, आता महापौरपदाचे आरक्षण सोडत जाहीर होण्यापूर्वीच काँग्रेस व भाजपने महापौर आमचाच होणार असा दावा केला आहे. यामुळे चर्चांना उधाण आले असून दुसरीकडे काँग्रेस पक्षात धानोरकर आणि वडेट्टीवार गटात कुरघोडीचे राजकारण सुरू झाल्याने दोघांनी आपल्या नगरसेवक समर्थकांना वेगळे ठेवले आहे. या भांडणाचा फायदा भाजप घेऊ शकतो, अशी परिस्थिती आहे. विशेष म्हणजे येथे शिवसेना उबाठा-वंचित मिळून ८ जण विजयी झाले असून ते महापौरपदाच्या शर्यतीत किंगमेकर ठरणार आहेत.

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत काँग्रेस मित्रपक्ष ३० जागा, भाजप मित्रपक्ष २४, शिवसेना उबाठा-वंचित ८, अपक्ष २, बसपा व एमआयएमला १ जागा मिळाली आहे. २२ जानेवारीला महापौर पदाची सोडत निघणार आहे. या आरक्षणाकडे सर्वांचे डोळे लागलेले




असताना कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने महापौर पदी कुणाची वर्णी लागेल हे चित्र सध्या तरी स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे महापौर पदासाठी रस्सीखेच सुरु झाली असून या पदावर काँग्रेससह भाजपने दावा केला आहे.

भाजप पक्षाकडून सुधीर मुनगंटीवार यांनी महापौर आमच्या पक्षाचा असेल, अशी प्रतिक्रिया दिली. एकीकडे काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी महापौर आमचा असेल असे म्हटले आहे. भाजप व काँग्रेसला मनपामध्ये महापौर बसवायचा असेल तर शिवसेनेची मदत त्यांना घ्यावी लागेल. सध्या शिवसेना महत्त्वाची भुमिका बजावणार आहे. आम्हाला महापौर पद देणार असाल तर आम्ही पाठिंबा देऊ, अशी भूमिका शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांनी दिली आहे.

# शेतकऱ्याची हत्या

## आर्वीत माथेफिरूचा हैदोस:भाजी बाजारात तिघांना काठीने बेदम मारहाण

**विदर्भ केसरी।**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी शहरात आज बुधवारी सकाळच्या सुमारास एका माथेफिरू युवकाने घातलेल्या उच्छादामुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. शहरातील गजबजलेल्या इंदिरा भाजी मार्केट परिसरात एका २२ वर्षीय माथेफिरूने लाकडी काठीने केलेल्या अमानुष मारहाणीत एका ७० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. शेतमाल विकण्यासाठी आलेल्या कष्टकऱ्यांवर असा जीवघेणा हल्ला झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर्वी येथील रहिवासी असलेल्या मथुरेश उर्फ मत्या लाडके (वय २२) या माथेफिरू युवकाने नग्नावस्थेत आज सकाळी इंदिरा भाजी मार्केटमध्ये अचानक धुमाकूळ घातला. त्याच्या हातात एक मोठी लाकडी काठी होती. मार्केटमध्ये भाजीपाला आणि इतर शेतमाल घेऊन आलेले शेतकरी आपल्या कामात व्यस्त असताना मथुरेशने त्यांच्यावर हल्ला चढवला. त्याने संजय रामकृष्ण राऊत (वय ७०) यांच्या डोक्यावर काठीने इतक्या जोरात प्रहार केले की, राऊत यांची यांची कवटी फुटून, मेंदू रस्त्यावर पडला होता. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. राऊत हे शेतकरी असून ते आपला माल विक्रीसाठी बाजारात आले होते.

### दोन शेतकरी गंभीर जखमी

**■ संजय राऊत यांच्यावरील हल्ल्यानंतर या माथेफिरूने तिथेच उपस्थित असलेले दुसरे शेतकरी रामराव महादेवराव वांगे (वय ८५) आणि शहजाद यांच्यावरही हल्ला केला. काठीने केलेल्या या जबर मारहाणीत हे दोघेही गंभीर जखमी झालेत. भरबाजारात सुरू असलेला हा थरार पाहून विक्रेते आणि ग्राहकांची एकच पळापळ झाली.**

### आरोपीला नागरिकांनी पकडले

**■ माथेफिरुने वृद्धाची निर्घृण हत्या केल्याची माहिती शहरात वाऱ्यासारखी पसरली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आणि काही धाडसी तरुणांनी माथेफिरू मथुरेशला घेराव घातला आणि त्याला जागीच पकडले. माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. त्याची मानसिक स्थिती बिघडलेली असल्याने त्याला सुरुवातीला उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले.**

## मोहराने बहरला आंबा.



**मंगरूळपीर, तालुक्यातील सोनखास परिसरात...मोहराने बहरला आंबा... मात्र ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली सर्वदुर आंमराई बहरल्या आणि अशात गारपीट झाली तर संपूर्ण मोहर जळुन जाण्याची भीती शेतकरी करत आहे........ छाया... मंगेश तीकडे सोनखास दैनिक विदर्भ केसरी प्रतिनिधी**

# मावळात भाजप–शिंदेसेना युतीचे उमेदवार जाहीर

**विदर्भ केसरी। वडगाव मावळ**

मावळ तालुक्यात भाजप-शिंदेसेना युतीची जिल्हा परिषदेचे पाच गट व पंचायत समितीच्या दहा गणांसाठी उमेदवारी यादी भाजपचे कोअर कमिटीचे अध्यक्ष निवृत्ती शेटे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत जाहीर केली.

मावळ तालुक्यात भाजप व शिंदेसेनेची युती झाली असून, पंचायत समिती टाकवे गणाची जागा शिंदेसेनेला सोडली आहे. उर्वरित सर्व ठिकाणी भाजपने उमेदवार उभे केले आहेत. यावेळी भाजपचे निवडणूक प्रचारप्रमुख बाळासाहेब नेवाळे, माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, अविनाश बवरे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबूराव वायकर, शांताराम कदम, शिंदेसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुकाप्रमुख रामभाऊ सावंत, अभिमन्यू शिंदे उपस्थित होते.

जिल्हा परिषद गटाचे उमेदवार

टाकवे-नाणे गट -मधुकर कोकाटे

इंदुरी - वराळे गट- मेघा भागवत

कार्ला -खडकाळा गट -आशाताई वायकर कुसगाव बुद्रुक- काले गट -दत्तात्रय गुंड सोमाटणे- चांदखेड गट -शीतल गराडे

पंचायत समिती गणाचे उमेदवार

टाकवे गण -अश्विनी कोंडे

नाणे गण- संगीता आढारी

वराळे गण- रवींद्र शेटे

इंदोरी गण- श्रीकृष्ण भेगडे

खडकाळा गण - प्रकाश गायकवाड

कार्ला गण- रंजना गायकवाड

कुसगाव बुद्रुक गण- नवनाथ हरपुडे

काले गण- सीमाताई ठाकर

# गडचिरोलीत 'लाईट्स काली अंबल' रुग्णालयामुळे महिलेला जीवदान

## ; विषबाधेच्या गंभीर स्थितीतून रुग्ण सुखरूप बाहेर

**विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड-:**

गड चिरोलीसारख्या दुर्गम भागात प्रगत वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. येथील लाईट्स काली अंबल मेमोरियल हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या चिकाटीमुळे आणि अत्याधुनिक 'क्रिटिकल केअर' सुविधेमुळे पार्सल गुंडी गावातील एका मध्यमवर्गीय महिलेचे प्राण वाचवण्यात यश आले आहे.

काय होती घटना?

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित




महिला ॲग्रो नो फॉक्स बीबा (Agro-No-Fox) मुळे झालेल्या विषबाधेमुळे अत्यंत अत्यवस्थ झाली होती. २८ डिसेंबर २०२५ रोजी तिला बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी तिला तीव्र श्वसनाचा त्रास होत होता आणि फुफ्फुसांमध्ये गंभीर गुंतागुंत निर्माण झाली होती.

**■ आव्हानात्मक उपचार प्रक्रिया**

रुग्णाची स्थिती पाहता डॉक्टरांनी तात्काळ आपत्कालीन जीवनरक्षक उपचार सुरू केले. पुढील उपचार प्रक्रिया खालीलप्रमाणे पार पडली: व्हेंटिलेटर सपोर्ट: रुग्णाला सुरुवातीला इंटरवेट करून आयसीयूमध्ये (ICU) मेकॅनिकल व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. ट्रॅकिओस्टोमी: दीर्घकाळ व्हेंटिलेटरवर रा हावे लागल्यामुळे नंतर तिची 'ट्रॅकिओस्टोमी' करण्यात आली.

गुंतागुंत: १५ दिवसांच्या आयसीयू वास्तव्यादरम्यान विषाच्या परिणामामुळे मेंदू, हृदय आणि फुफ्फुसावर गंभीर परिणाम झाला होता. फुफ्फुसाला सूज येण्यासोबतच तिला SVT (हृदयाच्या धडधडीचे) दोन झटके आले, ज्यामुळे प्रकृती अधिकच चिंताजनक बनली होती.

तज्ज्ञ डॉक्टरांची यशस्वी झुंज डॉक्टरांच्या सततच्या निरीक्षणामुळे आणि प्रगत उपचारांमुळे रुग्णाने हळूहळू प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. या यशस्वी उपचाराचे नेतृत्व मेडिकल तज्ञ डॉक्टर चेतन भुलतज्ञ डॉक्टर धीरज आणि एमपी तज्ञ डॉक्टर महेंद्र यांनी केले अखेर सर्व जीवनाशक लक्षणे सामान्य झाल्यानंतर महिलेला यशस्वीरित्या डिस्चार्ज देण्यात आला

व्यवस्थापकाचे आभार

या कठीण प्रसंगात रुग्णाच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी रुग्णालय प्रकाराचे आभार मानले आहेत विशेषता व्यवस्थापकीय संचालक श्री बी प्रभाकर यांनी गडचिरोली सारख्या दुर्गम भागात ही अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि संचालिका श्री कृती रेड्डी यांच्या सतत मार्गदर्शन मुळे हे या शक्य झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे

# अमरावतीत १६ ऑक्सिजन प्लांट बंद

## सिलिंडर खरेदीवर कोट्यवधींचा खर्च

**विदर्भ केसरी। अमरावती :**

कोरोनाकाळात रुग्णांना आवश्यक ऑक्सिजनची कमतरता भासू नये, यासाठी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांच्या आवारात एकूण १६ ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आले होते; परंतु पाच वर्षांपासून यातील एकही प्लांट कार्यान्वित केलेला नाही. त्यामुळे आजही शासकीय रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक ऑक्सिजनचा पुरवठा करण्यासाठी दरवर्षी ऑक्सिजन सिलिंडरवर कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. अशा स्थितीत प्लांटचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये अनेक रुग्णांना ऑक्सिजनअभावी जीव गमवावा लागला होता. यावेळी शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण झाला होता. परिणामी ऑक्सिजनच्या अभावामुळे रुग्णांचा जीव जाऊ नये, यासाठी सरकार तसेच पीएम केअर फंड, तसेच इतर निधीतून प्रत्येक जिल्ह्यात ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आले होते. जिल्ह्यातही शासकीय रुग्णालयांच्या आवारात १६ ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आले. या सर्व ऑक्सिजन प्लांटची दिवसाला १३.३६ मेट्रिक टन अन् ऑक्सिजन निर्माण करण्याची क्षमता आहे; परंतु कोरोनाची लाट ओसरल्यामुळे या ऑक्सिजन प्लांटचा वापरच झालेला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील इतर शासकीय रुग्णालयांत आजही बाहेरून ऑक्सिजन सिलिंडरचीच खरेदी केली जात असल्याची माहिती समोर आली.

अमरावती, धारणी, तिवसा, चांदूर बाजार, बेनोडा, नांदगाव खंडेश्वर, अंजनगाव सुर्जी, चांदूर रेल्वे, मोर्शी, गुरुकुंज मोझरी, दर्यापूर, अचलपूर येथील रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आले आहेत. जिल्हात ऑक्सिजन प्लांट सुरू करण्यासाठी तसेच त्यांच्या मेंटनन्ससाठी आवश्यक असलेले मनुष्यबळच रुग्णालय प्रशासनाला मिळालेला नाही.

- **ऑक्सिजन प्लांटची निर्मिती क्षमता (मेट्रिक टन)**
- **रुग्णालयातील प्लांट निर्मिती क्षमता**
- **उपजिल्हा रुग्णालय, धारणी ०.३९**
- **उपजिल्हा रुग्णालय, तिवसा ०.३९**
- **ग्रामीण रुग्णालय, चांदूर बाजार ०.३९**
- **बेनोडा (वरुड) पीएचसी ०.३९**
- **जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती १.८७**
- **ग्रामीण रुग्णालय, नांदगाव खंडे. ०.३९**
- **ग्रामीण रुग्णालय, अंजनगाव सुर्जी ०.३९**
- **सुपर हॉस्पिटल ०.९४**
- **सुपर हॉस्पिटल ०.२४**
- **ग्रामीण रुग्णालय, चांदूर रेल्वे ०.२४**
- **उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी ०.९४**
- **सुपर हॉस्पिटल १.८७**
- **आयुर्वेद महाविद्यालय, मोझरी १.८७**
- **उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर ०.३७**
- **इर्विन रुग्णालय १.१२**
- **अचलपूर उपजिल्हा रुग्णालय १.८७**
- **खासगी रुग्णालयात ऑक्सिजन प्लांट**

# 'त्या' रस्त्याला चाळणीचे स्वरूप

## दर्जात्मक रस्त्यांची निर्मिती त्वरित होणे गरजेचे - सविता विलास लांभाडे

**विदर्भ केसरी।मंगरूळपीर**

तालुक्यातील शेलूबाजार एक मुख्य बाजारपेठ असून शेलुबाजार ते शेंदुर्जना (मोरे) वनोजा नांदखेडा रस्त्याची खूपच अवस्था बिकट व गड्डे निर्माण झाले आहे या भागात मोठ्या प्रमाणात आजूबाजूला गाव खेडे जोडलेले असून त्वरित या भागातल्या रस्त्याची पाहणी करून रस्त्या संबंधित संबंधित विभागाला कळवून पाहणी करून घेणे तसेच रस्त्या अभावी खूप अडचण निर्माण होत असून खराब झालेल्या रस्त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना पैदल चालणारे लोकांची आणि मोटरसायकल वाहन इत्यादी या रस्त्यावरून ये जा करत असतात तसेच रस्त्याची काही वर्ष पहिले झालेले काम निकृष्ट दर्जाचे झाले असून संपूर्ण रस्ता उकडलेला पाहायला दिसत आहे.



ठेकेदाराने आतापर्यंत कुठल्याही प्रकारची दुरुस्ती केलेली नसून या रस्त्यांचे ये जा करणाऱ्या नागरिकांना हा खूप मोठे त्रास होत आहे अनेक रुग्णांनाही या रस्त्यावरून ये जा करण्याची गैरसोय होत आहे अनेक प्रकारचे अडचणी येणाऱ्या जाणाऱ्यांना नागरिकांना होत आहे या बाबीवर गांभीर्याने लक्ष घालून संबंधितांनी रस्त्याची उत्तम व्यवस्था करून या बाबीवर काम करावे अशी व्यथा सामाजिक क्षेत्रात असलेले विलास भाऊ लांभाडे व सौ सविता विलास लांभाडे यांनी लोक कल्याणकरिता व समस्याचे परिणाम कमी होण्याकरिता रस्त्याची व्यथा मांडली आहे....!

दैनिक विदर्भ केसरी | TODAY
विदर्भाचा मानबिंदू
चंद्रपूर
GOOD MORNING

## मेहा (बुज.) येथे तेली समाजाच्या श्रद्धेचा उत्सव; श्री संताजी जगनाडे महाराज जयंती व पालखी उत्साहात



मेहा (बु.) : येथील तेली समाजाच्या वतीने श्री संताजी जगनाडे महाराज जयंती व पालखी महोत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवसीय या महोत्सवात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सकाळपासून धार्मिक विधी, पूजा-अर्चा, अभिषेक तसेच भजन-कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारच्या सत्रात समाजप्रबोधनात्मक कार्यक्रम पार पडले. संध्याकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व भक्तीगीतांच्या निनादात निघालेल्या पालखीने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. दुसऱ्या दिवशी विविध धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. परिसरातील भाविक, ग्रामस्थ व तेली समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून महोत्सवात सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महोत्सवाच्या माध्यमातून समाजातील एकोप्याचे दर्शन घडले असून भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असल्याचे चित्र दिसून आले.

## संक्षीप्त



### अखेर मनसेचा दणका; जिल्हा परिषद शाळेच्या दुरुस्तीला सुरुवात

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : पांढरकवडा**

मनसेच्या आक्रमक भूमिकेनंतर अखेर प्रशासन हलले असून जिल्हा परिषद शाळेच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे. दीर्घकाळापासून शाळेच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याने मनसेकडून सातत्याने पाठपुरावा व निवेदने देण्यात येत होती. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.
या कामासाठी मनसेचे अध्यक्ष अश्विन ठाकरे यांनीही सहकार्य करण्याची भूमिका जाहीर केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या दुरुस्तीबाबत प्रशासनावर दबाव वाढवण्यात आला होता. अखेर शाळेच्या इमारतीची डागडुजी, संरचनात्मक दुरुस्ती व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामास सुरुवात झाली आहे. शाळेच्या दुरुस्तीचे काम सुरू होताच गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः शाळेतील विद्यार्थी आनंदित असून सुरक्षित आणि सुस्थितीत शाळा मिळणार असल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. पालक व ग्रामस्थांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.
दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात ठाम भूमिका घेत शाळेच्या प्रश्नाला वाचा फोडल्याबद्दल अश्विन ठाकरे यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे. "शिक्षणासारख्या मूलभूत प्रश्नासाठी मनसेने घेतलेली ही पुढाकाराची भूमिका कौतुकास्पद आहे," अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.
दुरुस्तीचे काम वेळेत आणि दर्जेदार पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत असून प्रशासनानेही कामावर लक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.



### चाचा नेहरू जिल्हास्तरीय बाल महोत्सव मध्ये झाले विविध सांस्कृतिक कार्यक्रम

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती : महिला व बाल विकास विभाग अमरावती चे अंतर्गत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय तर्फे तीन दिवसीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये दोन बालपण स्वच्छ द्वितीय दिवसातील द्वितीय सत्रामध्ये संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली त्यामध्ये एकल नृत्य व समूह नृत्य दोन्ही नृत्य प्रकार घेण्यात आले सांस्कृतिक कार्यक्रमाचे संचालन श्रीमती वैशाली चोरे मॅडम परिविक्षा अधिकारी यांनी केले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून माननीय अर्चना ढोरे मॅडम संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती व माननीय प्रशांत दुधी सर यांनी परीक्षक म्हणून भूमिका पार पाडले याप्रसंगी जिल्हा महिला कार्यालयातील सर्व कर्मचारी व जिल्हा महिला बालविकास अधिकारी अतुल भडांगे सर हे सुद्धा उपस्थित होते. सर्व बालगृहातील बालक बालिकांनी अतिशय सुंदर नृत्य विस्तार सादर केले

# आर्थिक साक्षरता आणि ग्रामीण उद्योजकता हेच सशक्त भारत निर्माणाचे गमक : अविनाश कोठाळे

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**



जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक अमरावती शाखा अचलपूर न जिजाऊ सावित्री दशरात्रो महोत्सव तोंडगाव ता अचलपूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला .बँकेचे रोप्य महोत्सवी वर्ष हे उद्योग वर्ष म्हणुन साजरे करण्याचे जिजाऊ बँकेने ठरविले असुन आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वच देशांमध्ये आणि भारतामध्ये सुद्धा 2025हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून युनायटेड नेशनस् ऑर्गनायझेशन या संस्थेचे घोषित केले आहे. भारताची अर्थव्यवस्था जगामध्ये चौथ्या क्रमांकावर असताना भारताचे दरडोई उत्पन्न केवळ 2.34लक्ष असून महाराष्ट्राचे उत्पन्न 2.80लक्ष असताना विदर्भाचे माणसी उत्पन्न केवळ रू.65368/- आहे. त्यामुळे जिजाऊ बँकेने विदर्भातील युवकांना स्वयंरोजगारासाठी विविध उद्योगांसाठी कर्ज देऊन मानसी उत्पन्न वाढवण्याचा उद्योग वर्षात निर्धार केला असल्याचे जिजाऊ बँकेचे अध्यक्ष ईजी.अविनाश कोठाळे यांनी प्रतिपादन केले.परंपरागत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी शेतकरी म्हणून जन्माला आलो पण उद्योजक म्हणून मरेल ही ही शपथ घेतली तरच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची जीवन व भविष्य उज्वल असल्याचे प्रतिपादन केले. सहकारच सुंदर जग घडविते हा संदेश जगभर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त देण्यात आला आहे. जिजाऊ बँक आर्थिक वर्ष 2025-2026 हे संपूर्ण वर्ष उद्योग वर्ष म्हणून साजरे करीत असल्याने जिल्हा उद्योग केंद्राच्या 254 विविध उद्योगांना ग्रामीण भागात 35%आणि शहरी भागात 25 % सबसिडी असलेल्या 25लक्ष रकमे पर्यंतच्या कर्जांना प्राधान्य देणार आहे. महिलांसाठी पर्यटन विकास मंडळाच्या आई योजना अंतर्गत 15 लक्ष पर्यंतचे कर्ज 7वर्ष व्याज परतावा सरकार भरणार या सुविधेसह 31 उद्योगांना देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान खाद्यपदार्थ प्रक्रियांच्या ४५ विविध उद्योगाकरिता १५लक्ष पर्यंत 35 टक्के सबसिडीचे कर्ज जिजाऊ बँक उपलब्ध करून देणार आहे. तोंडगाव येथे जिजाऊ बँकेचे अध्यक्ष ईजी. अविनाश कोठाळे यांनी सदर उदबोधनात आर्थिक साक्षरता व ग्रामीण उद्योजकता विकास महत्व तोंडगाव येथील जिजाऊ बँकेच्या कार्यक्रमात विषद केले. तसेच चांगल्या कर्जदारांना 50% टॉप-अप कर्ज देणार असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमासाठी बँकेचे उपाध्यक्ष श्री इंजि.प्रदीप चौधरी यांनी उद्योगाचे महत्व तथा बँकेची 470 कोटी ठेवी, 325 कोटी कर्ज ,'ए'ग्रेड जिजाऊ बँक, युवकांची काळजी घेणारी आणि ग्रामीण भागात आर्थिक मदत करणारी जिजाऊ बँक असून प्रत्येक उद्योगासाठी कर्ज मागणाऱ्या व्यक्तीला संपूर्ण सहकार्य करण्यात येईल असे सांगितले. व्यवस्थापक वृषल महल्ले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले व बँक ग्रामीण भागामध्ये साडेआठ टक्के व्याजदराने सुवर्ण कर्ज देणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला सरपंच सौ आशाताई संदीप चरपे यांनी महिला शक्ती चे महत्त्व पटवून देत सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षित केले तर जिजाऊ यांनी नागरिकांना स्वकर्तुत्वाचे व स्वाभिमानाचे बळ दिले. संदीपभाऊचरपे यांनी ग्रामविकासात जिजाऊ बँक च्या आर्थिक साक्षरता मोहिमेचे कौतुक केले व मा.अध्यक्ष यांचे आभार व्यक्त केले सेवा निवृत्त पोलीस उपायुक्त श्री प्रकाशराव आवारे , श्री निखिल डवरे श्री नांदुरकर श्रीभैया कडू, यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले शेख हरून शेख पापा श्री अभिजित पडोळे श्री अपराधे श्री मोहने हर्षवर्धन आवारे आणि कर्मचारी श्री योगेश चांदुरकर गणेश धाकटोड श्री प्रसाद कडू निलेश मालठाणे व समस्त नागरिक उपस्थित होते. आभार प्रदर्शन अभिजित पडोळे यांनी केले. याप्रसंगी ग्रामीण युवकांना प्रोत्साहित करण्यासाठी व ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी जिजाऊ बँकेने अर्थीक साक्षरता आणि ग्रामीण उद्योजकता विकास मार्गदर्शन कार्यक्रम या उपक्रमाचे सर्वांनी अभिनंदन व स्वागत केले.

## धानोरा तालुक्यातील मुरमाडी येथील थ्रेशर मशीनमध्ये अडकून निलंबित वनरक्षकाचा मृत्यू

### लाकुड तस्करीच्या प्रकरणात दोनदा झाले होते निलंबन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



धानोरा : धानाची मळणी करताना थ्रेशर मशिनमध्ये अडकून निलंबित वनरक्षकाचा मृत्यू झाल्याची घटना 21 जानेवारी रोजी बुधवार ला दुपारी 1:00.वा.च्या सुमारास धानोरा तालुक्यातील मुरमाडी येथे घडली.

सचिन देवराम हलामी वय,30 वर्ष रा.ईरुपटोला असे मृतकाचे नाव आहे. सचिन हलामी हा यापूर्वी वन विभागात वनरक्षक पदावर कार्यरत होता. काही वर्षांपूर्वी निलंबनाची कारवाई केल्याने, तो स्वगावी ईरुपटोला येथे कुटूंबियासोबत राहत होता. उपजिविकेसाठी तो ईरुपटोला येथीलच उमाजी जनबंधू यांच्या मालकीच्या ट्रॅक्टरवर चालक तसेच हमाल म्हणून काम करीत होता.सध्या सर्वत्र धान मळणीचे काम सुरू आहे. दरम्यान, बुधवारी मुरमाडी येथील शेतकरी विकास शेंडे यांच्या शेतात धान मळणी सुरू होती.मळणी सुरू असतांनाच तोल गेल्याने सचिनचा शरीर थ्रेशर मशीनमध्ये अर्धाअधिक शिरला व असह्य वेदनांसह तत्काळ त्याचा जीव गेला.

क्षणात हा प्रकार घडल्याने त्याचे सहकारी हतबल अवस्थेत केवळ बघतच राहिले.मृतक सचिनच्या पश्चात पत्नी,मुलगी व बराच असा आप्तपरिवार आहे.सदर घटनेबाबत कुरखेडा तालुक्याच्या मालेवाडा उपपोलिस स्टेशनमध्ये मर्ग दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. विशेष म्हणजे सचिन हलामी हा वनविभागात वनरक्षक पदावर कार्यरत होता. लाकुड तस्करीच्या प्रकरणात त्याच्यावर दोनदा निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. तेव्हापासून तो ट्रॅक्टरवर काम करीत होता.

## गडचिरोलीचे भविष्य उज्वल; विकास कामांना गती देण्यासाठी यंत्रणांनी ऑनफिल्ड कामावर लक्ष केंद्रीत करावे : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**




गडचिरोली : गडचिरोली जिल्हा सध्या विकासाच्या एका महत्त्वपूर्ण वळणावर उभा असून, येथील उच्च गुणवत्तेच्या लोह खनिजांच्या उपलब्धतेमुळे जिल्ह्यात लवकरच मोठे उद्योग निश्चितपणे आकारास येणार आहेत. या औद्योगिक क्रांतीमुळे जिल्ह्याचे 'भविष्य उज्वल' असून, याचा थेट लाभ स्थानिक जनतेला मिळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी पायाभूत सोयीसुविधांसोबतच मनुष्यबळ विकासावर लक्ष देण्याचे सांगितले. मुख्य सचिवांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. प्रधान सचिव तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, मुख्य वनसंरक्षक रमेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. गडचिरोलीच्या उज्वल भविष्यासाठी येथील युवकांचे कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे मुख्य सचिवांनी स्पष्ट केले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे काळानुरूप परिवर्तन करून त्यांना उद्योगांशी जोडले पाहिजे. जिल्ह्यात महाविद्यालयांची संख्या वाढवून उच्च शिक्षणाची दारे अधिक रुंदावणे आवश्यक आहे, जेणेकरून येथील तरुण पिढी येणाऱ्या नवीन उद्योगांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. शासकीय यंत्रणेने वैयक्तिक लाभाच्या प्रत्येक योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. प्रशासकीय कामात येणारी दिरंगाई टाळण्यासाठी अधिकाऱ्यांनी आता प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन विकास कामांना गती दिली पाहिजे. पूर्वी दुर्गम भागात जाण्यासाठी नक्षलवादाचे जे कारण दिले जात होते, तशी परिस्थिती आता राहिलेली नाही, त्यामुळे 'ऑनफिल्ड' कामावर सर्वांनी लक्ष केंद्रित करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील पायाभूत सुविधांबाबत बोलताना त्यांनी वनविभागाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. रस्ते, दळणवळण आणि दूरसंचार सुविधा उभारताना वनविभागाकडून होणारी अनावश्यक परवानग्यांची मागणी रास्त नसल्याचे त्यांनी नमूद केले. ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित असतानाही ऑफलाईन कागदपत्रांचा आग्रह धरणे चुकीचे असून, वनविभागाने वृक्षतोड टाळण्यासाठी कागदविरहित कामकाजाला प्राधान्य द्यावे. राष्ट्रीय महामार्ग, वैद्यकीय महाविद्यालयाचे बांधकाम आणि मोबाईल टॉवर उभारणी यांसारखी महत्त्वाची कामे परवानग्यांच्या अभावी प्रलंबित राहता कामा नयेत. क्षुल्लक कारणांसाठी एका विभागातून दुसऱ्या विभागात फाईल्स फिरत राहिल्याने कामात दिरंगाई होते. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढतो किंवा ते प्रकल्प इतर राज्यात स्थलांतरित होतात, याकडे लक्ष वेधून परवानगी प्रक्रियेतील टप्पे कमी करून कामे वेगाने सुरू करण्याचे त्यांनी सांगितले. विविध विभागांनी वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधण्याची यंत्रणा उभारण्याचेही त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत किती गावे रस्त्याने जोडली गेली आणि किती प्रलंबित आहेत याची माहिती मागवत त्यांनी, केंद्र शासन निधी देण्यास तत्पर असून प्रस्ताव वेळेत न गेल्यानेच निधी मिळत नसल्याचे निदर्शनास आणून दिले. प्रलंबित रस्ते प्रस्ताव तातडीने केंद्राकडे सादर करण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांच्या तक्रारींची दखल घेत, स्थानिक स्तरावर उपचार शक्य असताना रुग्णांना इतरत्र रेफर करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. 'हर घर नल' योजनेची अंमलबजावणी करताना केवळ पाईपलाईन न टाकता प्रत्यक्ष पाणी उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. रस्ते आणि दळणवळण सुविधांची वेळेत उभारणी न झाल्यास नक्षल पोषक वातावरण तयार होऊ शकते, असा इशारा देत त्यांनी विकासाच्या मार्गातील तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी स्वतः पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. बैठकीला विविध विभागांचे मुख्य अधिकारी उपस्थित होते.

## 'ब्लॉकचेन'तंत्रज्ञानावर आधारीत 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणालीवर खेळाडू व क्रीडा संघटनांनी नोंदणी करावी

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत राज्यातील गुणवत्ता धारक खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेतील 5 % आरक्षणाचा लाभ पारदर्शक, जलद आणि त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, या उद्देशाने शासनाने दि. 18/08/2026 च्या शासन निर्णयान्वये "ब्लॉकचेन" (Blockchain) व "कृत्रीम बुद्धिमत्ता" (Artificial Intelligence) या अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास मान्यता दिली आहे. या शासन निर्णयानुसार जुन्या कागदपत्रांवर आधारीत पडताळणी प्रक्रीया बंद करुन, पुर्णतः डिजीटल "क्रीडा ई-प्रमाण" प्रणाली कार्यावर करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने ल्हियातील राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत क्रीडा संघटनांनी व खेळाडूंनी पुढील प्रमाणे कार्यवाही आपल्या स्तरावरुन तातडीने करावी.

अभिलेख जतन (Data Archival) : स्पर्धा संपन्न झाल्यापासून 07 दिवसाच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी आणि गुणपत्रिका विहित नमुन्यात (Excel File) "क्रीडा ई-प्रमाण पोर्टल" (https://sports.maharashtra.gov.in ) वर अपलोड करण्यासाठी संचालनालयास सादर करणे संघटनांवर बंधनकारक राहील. डिजिटल स्वाक्षरी : सदर माहिती संबंधित संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्याने डिजिटल स्वाक्षरीने (DSC) प्रमाणित करणे आवश्यक राहील. दंडात्मक तदतुद : जी संघटना विहीत 07 दिवसाच्या मुदतीत माहिती ब्लॉकचेन वर अपलोड करणार नाही, ती संघटना "स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट" (Smart Contract) द्वारे स्वयंचलितरित्या "डिफॉल्टर" (Defaulter) यादीत समाविष्ट होईल. अशा परिस्थितीत खेळाडूंचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संघटनेची राहील.

खेळाडूंच्या ोंदणी प्रक्रीयेबाबत (Player Registration) : खेळाडूंनी ई-प्रमाण पोर्टलवर आपल्या आधार-संलग्न (Aadhaar-linked) आयडी द्वारे लॉग-इन करुन नोंदणी करणे अनिवार्य आहे. खेळाडूंनी सादर केलेली माहिती आणि संघटनेने ब्लॉकचेनवर अपलोड केलेला "अभिलेख हॅश" (Record Hash) यांची प्रणालीद्वारे स्वयंचलीत पडताळणी होईल त्यामुळे खेळाडूंना यापुढे पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयास येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. अपिलीय तरतुद : जर तांत्रिक कारणास्तव एखाद्या खेळाडूचे प्रमाणपत्र नामंजुर झाल्यास, तक्रार करण्याची व तक्रारीनंतरही खेळाडूस प्रमाणपत्र न मिळाल्यास 30 दिवसाच्या आत ऑनलाईन अपिल करण्याची सुविधा उपलब्ध आहे. दि. 08 जानेवारी 2026 रोजीचा शासन निर्णय अत्यंत महत्वाचा असून 5 टक्के खेळाडू आरक्षणाच्या लाभाशी निगडीत असल्याने सदर शासन निर्णयाचे अवलोकन करुन संबंधित खेळाडू व संघटना यांनी कार्यवाही करावी असे जिल्हा क्रीडा अधिकारी भास्कर घटाळे यांनी कळविले आहे.

# राज्यस्तरीय शालेय शूटिंग बॉल स्पर्धा: मुलांच्या गटात मुंबई, तर मुलींच्या गटात कोल्हापूर अजिंक्य!

### यजमान अमरावती विभागाच्या मुलींची झुंज अपयशी,नाशिक व पुणे विभागाचाही पदकतालिकेत दबदबा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

मूर्तिजापूर : येथील क्रीडा संकुलात उत्साहात पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय शूटिंग बॉल स्पर्धेत मुंबई आणि कोल्हापूरच्या खेळाडूंनी आपल्या अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर मोहोर उमटवली. मुलांच्या अंतिम सामन्यात मुंबई विभागाने नाशिकचा पराभव केला, तर मुलींच्या गटात कोल्हापूर विभागाने यजमान अमरावती विभागावर मात करत सुवर्णपदक पटकावले. मुलांचा गट, मुंबईचा 'पावरफुल' स्मॅश मुलांच्या अंतिम सामन्यात मुंबई आणि नाशिक विभागामध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. सुरुवातीपासूनच मुंबईच्या खेळाडूंनी आक्रमक चढाया करत नाशिकच्या बचावाला खिंडार पाडले. मुंबईच्या अचूक सर्व्हिस आणि नेटवरील चपळाईमुळे त्यांनी नाशिक विभागावर विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. नाशिक विभागाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले, तर पुणे विभागाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक मिळवला. मुलींचा गट, कोल्हापूरची बाजी; अमरावती उपविजेता मुलींच्या गटात कोल्हापूर विभागाचा दबदबा पाहायला मिळाला. अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या मुलींनी उत्कृष्ट ताळमेळ दाखवत यजमान अमरावती विभागाचे आव्हान मोडीत काढले आणि प्रथम क्रमांक आपल्या नावावर केला. प्रेक्षकांचा मोठा पाठिंबा लाभलेल्या अमरावती विभागाला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. या गटातही पुणे विभागाने सातत्य राखत तृतीय क्रमांक पटकावला. मुले मुंबई विभाग नाशिक विभाग पुणे विभाग मुली कोल्हापूर विभाग अमरावती विभाग पुणे विभाग स्थानिक खेळाडूंचे कौतुक मूर्तिजापूरमध्ये या स्पर्धा अत्यंत नियोजित पद्धतीने पार पडल्या. राज्यभरातून आलेल्या खेळाडूंनी येथील क्रीडा सुविधांचे आणि आयोजनाचे कौतुक केले. समारोप प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल मुंबई आणि कोल्हापूर विभागाच्या प्रशिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.



दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी | TODAY

# गडचिरोली

GOOD MORNING

## गडचिरोली जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज - गडचिरोली जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक जिल्ह्याचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. या बैठकीस आमदार रामदास मसराम आणि आमदार मिलिंद नरोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीदरम्यान जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या विकासकामांना प्राधान्याने मंजुरी देऊन निधीचे योग्य व समतोल वितरण करण्यात यावे, अशी मागणी सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे करण्यात आली. यावेळी सन २०२६–२७ साठीच्या जिल्हा वार्षिक प्रारूप आराखड्यास मंजुरी देण्यात आली. तसेच चालू आर्थिक वर्षातील जिल्हा विकास निधीतून करण्यात आलेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



## संक्षिप्त



### सत्यमेव जयते फार्मर कपसाठी 47 शेतकरी प्रशिक्षणासाठी रवाना

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

उमेद विभाग यांच्या माध्यमातून पाणी फाउंडेशन अंतर्गत आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप 2026 या स्पर्धेच्या निवासी प्रशिक्षणासाठी तालुक्यातील 47 शेतकरी रवाना झाले. या प्रसंगी गटविकास अधिकारी श्री. सुरेंद्र गोगले, तालुका कृषी अधिकारी श्री. कुणाल राऊत, नोडल अधिकारी श्री. सोपान सोळंके तसेच उमेद विभागाचे तालुका व्यवस्थापक श्री.डोरलीकर, क्लस्टर समन्वयक श्री. साईनाथ उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून सर्व प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सत्यमेव जयते फार्मर कप 2026 या स्पर्धेसाठी या शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून, खर्च कमी करून उत्पन्न वाढवणे, शाश्वत शेती पद्धती अवलंबणे व सामूहिक प्रयत्नांतून शेतीतील समस्या सोडवणे हे या स्पर्धेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी ओळखून त्या एकत्रितपणे सोडवण्यावर या उपक्रमात भर देण्यात येणार आहे. ही स्पर्धा महाराष्ट्रातील 351 ग्रामीण तालुक्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. सदरचे निवासी प्रशिक्षण रोल प्रशिक्षण केंद्र, अहेरी येथे होत असून, तीन दिवसीय प्रशिक्षणात शेतकऱ्यांना प्रत्यक्ष ज्ञान व कृतीवर भर दिला जाणार आहे. भामरगड सारख्या अतिदुर्गम आदिवासी बहुल भागात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणे अतिशय महत्त्वाचे आहे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे. सर्व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पाणी फाउंडेशन ची टीम असणार आहे.

# ट्रकच्या धडकेत महिला ठार, दोघी गंभीर जखमी

## गडचिरोलीत भरदिवसा हिट अँड रन ; अवजड वाहन बंदी असतानाही ट्रक शहरात कसा? पोलिस भूमिकेवर प्रश्नचिन्ह..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

गडचिरोली : चंद्रपूर मार्गावरील जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर भरदिवसा ट्रकने दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला, तर दोन जणी गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवार, 18 जानेवारी रोजी दुपारी सुमारे 3 वाजताच्या सुमारास घडली. मंदा विजय एडलावार (वय 43, रा. लांझेडा, गडचिरोली) असे मृत महिलेचे नाव आहे. मंदा एडलावार या आपली मुलगी खुशी विजय एडलावार (वय वर्षे 21) व पुतणी ऋतुजा संतोष एडलावार (वय वर्षे 12) यांच्यासह चंद्रपूर मार्गावरील एका कार्यक्रमासाठी एमएच 31 डीएच 8731 क्रमांकाच्या स्कुटीने जात होत्या. जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर मागून येणाऱ्या एमएच 34 बीझेड 8220 क्रमांकाच्या आयसर ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.




या धडकेत तिघीही रस्त्यावर कोसळल्या. अपघातानंतर गंभीर जखमी झालेल्या तिघींना तातडीने उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान मंदा एडलावार यांचा मृत्यू झाला. खुशी व ऋतुजा यांच्यावर सध्या उपचार सुरु असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. दरम्यान, अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरून पळ काढल्याने हा प्रकार हिट-अँड-रन ठरला आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ट्रक कोणाचा? माहिती का दडपली जातेय?

■ अपघातानंतर पसार झालेल्या ट्रकचा क्रमांक पोलिसांना ज्ञात असूनही सदर ट्रक कोणाच्या मालकीचा आहे, त्यामध्ये कोणता माल वाहतूक होत होती, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. ट्रक क्रमांकावरून वाहन मालकाचा तपशील सहज मिळू शकतो, असे असतानाही पोलिसांकडून माहिती उघड न केल्याने संशयाची सुई वळू लागली आहे. चंद्रपूर मार्गावरून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू व मुरुम वाहतूक करणारे ट्रक सर्रास धावतात. त्यामुळे हा ट्रकही अशाच अवैध वाहतुकीतील तर नव्हता ना, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ट्रकचालकाला पोलिस शोधून काढणार का, की हे प्रकरणही गूढातच राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अवजड वाहन बंदी असतानाही ट्रक शहरात कसा?

■ विशेष म्हणजे, रविवार असल्याने शहरात आठवडी बाजार भरतो. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव अवजड वाहनांना शहरातून प्रवेशास मज्जाव करण्यात आला होता. असे असतानाही हा ट्रक जिल्हा रुग्णालयासारख्या वर्दळीच्या परिसरात कसा पोहोचला, हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. यामुळे वाहतूक नियंत्रण व पोलिसांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भरदिवसा घडलेल्या या दुर्घटनेमुळे गडचिरोली शहरात संतापाची लाट उसळली असून, दोषींवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी होत आहे. निष्पाप महिलेचा बळी घेणारा ट्रक आणि त्यामागील सत्य कधी उघड होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

# अनिल कुनघाळकर यांची नगर परिषद बांधकाम सभापतीपदी नियुक्ती ; शहर विकासाला नवी दिशा

## नगराध्यक्ष प्रणोती निबोंरकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे



गडचिरोली : नगराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण अशी घडामोड घडली असून नगरसेवक अनिल कुनघाळकर यांची नगर परिषद बांधकाम सभापती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी नगराध्यक्ष प्रणोती निबोंरकर यांनी अनिल कुनघाळकर यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या निवडीमुळे नगरातील विकासकामांना नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अनिल कुनघाळकर हे नगरपरिषदेतील अनुभवी, अभ्यासू आणि कार्यक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी नगर परिषद उपाध्यक्ष या महत्त्वाच्या पदाची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली आहे. त्यांच्या कार्यकाळात शहरातील अनेक विकासकामे मार्गी लागली असून, नागरी प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रभावी भूमिका बजावली होती. नगरपरिषदेत दीर्घ अनुभव, प्रशासकीय कामकाजाची सखोल जाण, नागरिकांशी असलेला थेट संवाद आणि विकासाभिमुख दृष्टिकोन या सर्व बाबी लक्षात घेता त्यांची बांधकाम सभापतीपदी निवड करण्यात आल्याचे बोलले जात आहे. या नियुक्तीमुळे नगरपरिषदेच्या बांधकाम विभागाला सक्षम नेतृत्व मिळाले आहे.

या नियुक्तीनंतर नगरपरिषदेतील सर्व सदस्य, पदाधिकारी, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी अनिल कुनघाळकर यांचे अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव केला.

नगराध्यक्ष प्रणोती निबोंरकर यांनीही त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास व्यक्त करत सांगितले की, नगराच्या विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल. अनिल कुनघाळकर यांची बांधकाम सभापतीपदी नियुक्ती ही नगराच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत असून, येत्या काळात नगरात दर्जेदार व नियोजनबद्ध विकासकामे पाहायला मिळतील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

> शहरातील रस्त्यांची दुरुस्ती व नवीन रस्ते बांधकाम, नाले व गटारी व्यवस्थापन, पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा तसेच विकासकामांमध्ये गुणवत्ता व पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. शहराच्या विकासात कोणतीही तडजोड न करता नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण केल्या जातील.
> — **अनिल कुनघाळकर**, बांधकाम सभापती

# मराठीचा दृष्टिकोन केंद्रातून परीघाकडे नेण्यासाठी मराठीचे सखोल अध्ययन आवश्यक : प्रा. डॉ. सविता गोविंदवार

## आदर्श महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : महाराष्ट्राला भाषा व संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभलेला असून मराठी भाषेतील साहित्य सर्वश्रेष्ठ आहे. ज्या भाषेतील साहित्य सर्वश्रेष्ठ आहे ती भाषा अभिजात ठरते. मराठी ही सर्वसामान्य जनतेची भाषा आहे. मराठीचा दृष्टिकोन केंद्रातून परीघाकडे नेण्यासाठी मराठी संस्कृतीचे सखोल अध्ययन करणे अत्यंत आवश्यक आहे" असे अमूल्य मार्गदर्शन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सविता गोविंदवार यांनी केले. त्या स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'मराठी भाषा : जतन व संवर्धन' या विषयावर आयोजित व्याख्यानाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या व्याख्यानाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अमोल चव्हाण, श्री. शांतीलाल सेता तसेच सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. हितेंद्र धोटे उपस्थित होते.




पूढे बोलतांना त्या म्हणाल्या की,"भाषा जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या भाषेबद्दल अभिमान बाळगला पाहिजे. आपल्या परिसरातील बोलीभाषा बोलताना कोणताही संकोच बाळगू नये, सजग राहून भाषेचे संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे, असे त्यांनी नमूद केले. प्रमुख अतिथी स्थानावरून बोलतांना डॉ. हितेंद्र धोटे म्हणाले की, "भाषेमधून त्या-त्या समाजाची संस्कृती प्रतिबिंबित होत असते. भाषा जिवंत ठेवण्यासाठी भाषेतील लोककला व लोकसंस्कृतीचा अविष्कार करण्यासाठी प्रत्येक मराठी भाषिकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे."असे मत मांडले. कार्यक्रमाच्या इतर अतिथींनी सुद्धा यथायोग्य मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाच्या प्राध्यापिका वैशाली लिचडे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापिका शीतल कोसे यांनी तर आभार प्रदर्शन गुलाब बावनथडे यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्लास्टिकच्या वापरामुळे होणा-या दुष्परिणामांबाबत जनजागृती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : पीएम श्री पंडित जवाहरलाल नेहरू नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा, रामनगर, गडचिरोली येथे नगर परिषदेचे मुख्याधिकारी मा. सुर्यकांत पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखालीनायलॉन/ चायनीज मांजा तसेच प्लास्टिक पतंग यांच्या वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाअंतर्गत सर्वप्रथम"नायलॉन मांजा पर्यावरणाची हानी" या विषयावरनगर परिषद गडचिरोलीचे शहर समन्वयक यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे विशेष चर्चासत्र घेण्यात आले.

या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी, नागरिक तसेच पर्यावरणाला होणाऱ्या हानीबाबत आपली मते मांडली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्रियपणे सहभागी करून घेत नायलॉन मांजामुळे होणारे अपघात, पक्ष्यांचे मृत्यू, पशुधनाचे नुकसान व पर्यावरणीय असंतुलन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना या विषयावर आपले विचार लेखन स्वरूपात मांडण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले विचार व्यक्त केले.

### सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनी

■ स्वरा सतीश मरघडे
आरोही प्रमोद येनगंटीवार
अनन्य उपाध्ये
शुभ्रा अनिल चोधरी
आराध्य धनराज मिसार
ऋतुजा विजय चीरे
वैष्णवी उमेश वैद्य
रिग्वेद सुधीर गोहणे
ओवी अमोल निकोडे
पूर्वी संदीप शेरकी
श्रेया महेश नैताम
निधी गौतम नगराळे
शुभ्रा सुनिल उरकुडे
श्रावणी गौतम उंदीरवाडे
लक्षिता चांदेकर

# प्रत्येक कुटुंबापर्यंत योजनांचा थेट लाभ सुनिश्चित करा

## मुख्य सचिव राजेश अग्रवाल : ग्रामीण विकासासाठी नाविन्यपूर्ण व प्रायोगिक प्रयोगांचा आग्रह

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे



गडचिरोली : केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्षात शेवटच्या घटकापर्यंत खात्रीशीर पोहोचविण्यासाठी प्रायोगिक स्तरावर काही गावांची निवड करून त्या गावांतील प्रत्येक कुटुंबाला किमान काही शासकीय योजनांचा थेट लाभ मिळेल, अशी कार्यपद्धती राबविण्याचे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. ग्रामीण विकाससंबंधी जिल्हा परिषद व आदिवासी विकास यंत्रणेचा आढावा मुख्य सचिव यांनी आज जिल्हा परिषद सभागृहात घेतला त्यावेळी ते बोलत होते. प्रधान सचिव तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास महामंडळाच्या आयुक्त लीना बनसोड, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, आदिवासी अपर आयुक्त आयुषी सिंह, मुख्य वनसंरक्षक रमेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी कुशल जैन, अमर राऊत व एम. अरूण , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार व जिल्हा परिषद कार्यकारी यंत्रणेचे सर्व प्रमुख अधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्य सचिवांनी सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या ४०० हून अधिक योजना अस्तित्वात असून त्या प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी नाविन्यपूर्ण व परिणामकारक प्रयोग करणे आवश्यक आहे. यासाठी निवडक गावांमध्ये प्रत्येक घराचा सविस्तर सर्वेक्षणात्मक आढावा घ्यावा. त्या कुटुंबाला कोणत्या योजनांचा लाभ देता येईल, याची तात्काळ पडताळणी करून तेथेच अर्ज भरून, तत्काळ मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करून प्रत्यक्ष लाभ देण्याची प्रक्रिया राबवावी, असे निर्देश त्यांनी दिले. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय पथकांनी दुर्गम भागातील गावांमध्ये मुक्कामी राहून काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर सातत्याने लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक लाभार्थ्याची सविस्तर माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध ठेवावी. लाभार्थ्यांना फोन किंवा व्हिडिओ कॉलद्वारे थेट संपर्क साधून प्रत्यक्ष लाभ मिळतो आहे की नाही, याची खात्री करता येईल, अशी आधुनिक डिजिटल व कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली विकसित करण्याचे त्यांनी सांगितले. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत असून, त्यातून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुलांच्या शिक्षणासोबतच कौशल्य विकासावर विशेष लक्ष देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. स्थानिक युवकांना रोजगारासाठी बाहेर जावे लागू नये, यासाठी शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणाची दिशा उद्योगांच्या गरजांशी सुसंगत असावी, असेही त्यांनी सांगितले. ग्रामीण दळणवळण व संपर्क व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने एसटी बससेवेची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगत त्यांनी १००० लोकसंख्येवरील प्रत्येक गावात बससेवा पोहोचविण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांच्या उपजीविकेत प्रत्यक्ष सुधारणा करून जीवनमान बदलणाऱ्या योजनांचे ठोस प्रस्ताव सादर केल्यास अशा योजनांना शासनस्तरावरून जास्त प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मुख्य सचिवांनी स्पष्ट केले.

तसेच, वनपट्टेधारक शेतकऱ्यांना महाफार्मर आयडी व प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळावा, यासाठी महसूल विभागाने विशेष लक्ष द्यावे. जिल्हा परिषद व आदिवासी विकास विभागाने महसूल विभागाप्रमाणे पेपरलेस व पारदर्शक प्रशासकीय प्रणाली विकसित करण्यावर भर देण्याचेही ते म्हणाले. विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या वन व पर्यावरण विभागाच्या परवानग्यांबाबत बोलताना, अनावश्यक विलंब व प्रक्रियात्मक अडथळ्यांमुळे प्रकल्प खर्च वाढतो आणि महत्त्वाचे प्रकल्प रखडतात किंवा इतर राज्यात स्थलांतरित होतात, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे वनविभागाने कालबद्ध, उत्तरदायी व सकारात्मक निर्णयप्रक्रिया अवलंबावी, असे सूचना मुख्य सचिवांनी दिल्या. गडचिरोली जिल्ह्याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, पूर्वी येथे अधिकाऱ्यांना नियुक्तीकडे शिक्षेच्या दृष्टीने पाहिले जात होते; मात्र आता गडचिरोली ही संधीची आणि प्रभावी कामगिरीची 'प्राईज पोस्टिंग' ठरली आहे. येथे काम करण्यासाठी मोठा वाव असून, जिल्ह्याच्या विकासासाठी यंत्रणांना मंत्रालय स्तरावरून आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. या बैठकीत जिल्हा परिषद व आदिवासी विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येत असलेल्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम, घरकुल, दिव्यांग कल्याण, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, धरतीआबा, पेसा क्षेत्रातील उपक्रम आदी विविध योजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद व आदिवासी विकास यंत्रणेचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**